निर्भीड, परखड, वास्तववादी व परिवर्तनशील विचारसरणीचे....
दैनिक निशस्त्र योध्दा
मुख्य संपादक : सुबोध केशवराव आखाडे | www.epapernishastrayoddha.com | TC.NO.MAHMAR/26/A1288 | E-mail : nishastrayoddha@gmail.com | buldhanaupdate.com
मेहकर | बुधवार । २८ ऑक्टोबर २०२६ । वर्ष-पहिले । अंक क्र. २२० । पृष्ठे-४ । किंमत-४ रु. | बुलढाणा । अकोला । वाशिम । यवतमाळ । जालना । छ. संभाजीनगर । अमरावती । धुळे । नंदुरबार । नागपूर । भंडारा येथून एकाचवेळी प्रसिध्द

## संपूर्ण राज्यातील विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा ५ नोव्हेंबरला पुण्यात मोर्चा

**अमरावती :** राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीच्या वतीने येत्या ५ नोव्हेंबर २०२६ रोजी उच्च शिक्षण संचालनालय (पुणे) येथे मोर्चा व एकदिवसीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. संयुक्त कृती समितीचे अध्यक्ष अजय देशमुख यांच्या नेतृत्वात हे आंदोलन छेडले जाणार असल्याची माहिती कृती समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांना ५ हजार, ई-व्हेईकल निर्मिती ते चिपी विमानतळ... कॅबिनेट बैठकीत १२ मोठे निर्णय

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यातील दीड कोटी शेतकऱ्यांना दिवाळी पूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम रक्कम मिळणार आहे. पिकांचे ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट अग्रीम रक्कम देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. शेतकऱ्यांच्या खात्यात थेट डीबीटी द्वारे अग्रीम जमा होणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत १२ निर्णय

मातोश्री ग्रामसमृद्धी शेत- पाणंद रस्ते योजना विकसित भारत – जी राम जी योजनेसोबतच विविध योजनांच्या समन्वयातून सुरु ठेवली जाणार. या राज्यस्तरीय योजनेस जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून कामे करता येणार, त्यासाठी योजनेला जिल्हास्तरीय योजना म्हणूनही मान्यता. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय स्तरावरील अडचणी सोडविण्यासाठी राज्यस्तरीय समितीला अधिकार देण्यास मंजुरी ( रोजगार हमी योजना विभाग)

राज्यातील दिव्यांग जनांच्या कल्याणासाठी महत्वाचे पाऊल. दिव्यांगांसाठीच्या कल्याण, पुनर्वसन व सक्षमीकरणाकरीता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत एक टक्के निधीचा वापर करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी. (दिव्यांग सक्षमीकरण विभाग)



राज्यातील दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यातील दिड कोटी शेतकऱ्यांना दिवाळी पूर्वी पाच हजार रुपयांचा अग्रीम मिळणार. पिकांचे ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट अग्रीम मिळणार. शेतकऱ्यांच्या खात्यात थेट डीबीटी द्वारे अग्रीम जमा होणार. (मदत व पुनर्वसन विभाग)

जलसंपदा विभागाचा ३९ हजार ७२२ पदांचा आकृतीबंध मंजूर. पाच महामंडळासह, क्षेत्रिय कार्यालयांकरिता सुधारीत आकृतिबंध निश्चित. नवीन यंत्रणा, कार्यलयांची पुनर्रचना. सन २०१६ अखेरपर्यंत सिंचनाखाली असलेल्या ४५ लाख हेक्टर क्षेत्रामध्ये १३ लाख हेक्टरची वाढ. सन २०२५ अखेरपर्यंत ५८ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली. वाढीव क्षेत्राच्या व्यवस्थापनाकरिता १३४० सिंचन शाखा व वाढीव ११० सिंचन शाखा अशा एकूण १४५० सिंचन शाखा कार्यालयासाठी पदनिर्मिती. पाच महामंडळांसाठी भूसंपादन तज्ज्ञ, कृषी विषयक तज्ज्ञ, सामाजिक बदल तज्ज्ञ असे तीन नवीन संवर्ग, अशा एकूण पंधरा कार्यकारी अभियंता दर्जाच्या पदांची निर्मिती. तर काही पदांचे एकत्रीकरण करून सिंचन सहायक नवीन संवर्ग निर्माण करण्यास मंजुरी. (जलसंपदा विभाग )

पुण्यातील लोहगाव येथे भारत मंडपम च्या उभारणीस गती मिळणार. पुणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील लोहगाव येथील खेळाचे मैदानाच्या आरक्षणात बदल करून या ठिकाणी नवी दिल्लीतील भारत मंडपमच्या धर्तीवर राष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शन केंद्र होणार. (नगर विकास)

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन प्रोत्साहन धोरणांतर्गत बजाज ऑटो लिमिटेड कंपनीला ई-व्हेईकल निर्मितीसाठी ६६ कोटी ८२ लाख रुपये देण्यास मंजुरी. (परिवहन विभाग)

सिंधुदूर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळासाठीची विमान सेवा नव्या दमाने सुरु होणार. नवी मुंबई चिपी(सिंधुदुर्ग)- नवी मुंबई आणि नवी मुंबई-चिपी (सिंधुदुर्ग) हवाई मार्गाकरिता विमान कंपन्यांना शंभर टक्के ( व्यवहार्यता तफावत निधी - निधी देण्यास मंजुरी. (सामान्य प्रशासन- विमानचालन विभाग)

लातूर जिल्ह्यातील शिरूर ताजबंद (ता. अहमदपूर) येथील मल्हारराव होळकर भटक्या विमुक्त जमाती सहकारी सूतगिरणीला शासन अर्थसहाय्य मिळणार. (वस्त्रोद्योग विभाग)

महाराष्ट्र सार्वजनिक-खाजगी भागीदारी धोरण (पीपीपी) मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी. प्रकल्पांची छाननी, तत्वत: मान्यता, प्रस्तावासाठी विनंती, व्यवहार संरचना, निविदा प्रक्रीया व बोली या टप्प्यांचे सुनियोजन होणार. (नियोजन विभाग)

राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये आता सहायक प्रशासन अधिकारी असे एकच पद राहणार. लिपिकवर्गीय गट-क संवर्गातील कनिष्ठ प्रशासन अधिकारी (एस – १३) आणि सहायक प्रशासन अधिकारी (एस-१४) हे दोन संवर्ग एकत्रित करण्यात येणार. त्यामुळे सहायक प्रशासन अधिकारी (एस-१४) असा एकच संवर्ग राहणार. (ग्राम विकास विभाग)

धुळे जिल्ह्यातील मौजे रावेर येथील जमीन एमआयडीसीली देण्यास मंजुरी. रावेर येथील २८९ हेक्टर ६९आर जमीन प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, धुळे यांना एमआयडीसीच्या विस्तारासाठी उपलब्ध करुन देण्यास मंजुरी. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ च्या अधिनियमात सुधारणा करण्यास मंजुरी. प्र – कुलगुरू पदावरील व्यक्तीस हटविण्याचे अधिकार कुलपती यांना मिळणार. (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

## ५०० कोटींच्या आरोपांची होणार एसआयटी चौकशी; मुंबई पोलीस आयुक्तांकडून आदेश जारी

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी प्रसारित केलेल्या ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहारासंबंधी ध्वनिचित्रफितीची चौकशी करण्यासाठी अप्पर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) समिती नेमली आहे. मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी याबाबतचे आदेश सोमवारी जारी केले. जरांगे पाटील यांनी मराठा समाजाचे आंदोलन स्थगित करण्यासाठी भाजपाने शिंदेंमार्फत ५०० कोटी रुपये दिल्याची ध्वनिचित्रफितीत प्रसारित केली होती. भाजपशी संबंधित काही व्यक्तींच्या संभाषणाचा आणि कथित आर्थिक व्यवहारांचा उल्लेखही या ध्वनिचित्रफितीत आहे. जरांगे-पाटील यांनी या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सहभाग नसेल, तर त्यांनी चौकशी करून घ्यावी; अन्यथा त्यांच्या सहभागाबाबतही प्रश्न उपस्थित होतील, असे आव्हान दिले होते. त्यानंतर या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी नियुक्त करण्यात आली. अप्पर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे हे या समितीचे अध्यक्ष असतील. त्यांच्यासोबत दक्षिण परिमंडळाचे पोलीस उपायुक्त विजयकांत सागर आणि सायबर गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे यांचा समावेश आहे. ध्वनिचित्रफितीत विविध व्यक्तींची नावे आणि विशिष्ट रकमेच्या देवाणघेवाणीचे उल्लेख असल्याने त्याची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तपासातील प्रगतीची माहिती वेळोवेळी सादर करण्यासही पोलिस आयुक्तांनी एसआयटीला सांगितले आहे.

## कुणीही असो वृक्षतोडीला विरोधच; जैन मुनी निलेशचंद्रांचं राज ठाकरेंना समर्थन, म्हणाले, आंदोलनात सहभागी होईन

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** कर्जत-भीमाशंकर येथील साय डोंगरात सुरू असलेल्या वृक्षतोडीवरुन (ऊीाे) सध्या राज्यभर संतापाचे वातावरण आहे. येथील वृक्षतोडीला विरोध करत स्थानिकांनी टोरंट प्रकल्पासाठी सरकारने घेतलेल्या निर्णयालाही थेट आपला विरोध दर्शवला आहे. स्थानिकांच्या आंदोलनानंतर येथील वृक्षतोडीला पर्यावरण प्रेमी, निसर्ग मित्र आणि आता राजकीय नेतेही पाठिंबा दर्शवत आहेत. आमदार आदित्य ठाकरेंनी साय डोंगरात भेट दिली असून मनसेप्रमुख राज ठाकरे देखील भेट देणार आहेत. त्याच पार्श्वभूमीवर जैन मुनी निलेशचंद्र यांनीही राज ठाकरेंच्या भूमिकेला आपला पाठिंबा दर्शवला आहे.

कर्जत-भीमाशंकरच्या डोंगरात होत असलेल्या भूमिकेवरुन सरकारला विरोध वाढत असून त्यांच्या पक्षातील काहींनी विरोध केल्याचं चित्र आहे. कबूतर वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरलेले निलेश चंद्रमुनी भीमाशंकर कर्जत मध्ये वृक्षतोड सुरू असताना कुठे आहेत, अशा प्रतिक्रिया सोशल मीडियावर येत आहेत. भगवान महावीरांचे म्हणणं आहे, जिओ और जीने दो. त्यामुळे, राज ठाकरे जर जंगल वाचवण्यासाठी आंदोलन करत असतील किंवा तो प्रश्न उपस्थित करत असतील तर मी त्यांना पाठिंबा देतो. राज ठाकरे स्वत: पशुप्रेमी आहेत. कबुतराचा विषय तुम्ही वेगळा ठेवा. राज ठाकरे यांनी जी मोहीम आता सुरू केली, जो विषय हाती घेतला, तो वेगळा आहे. मी सगळ्या शिवप्रेमींना महाराष्ट्रातल्या लोकांना आवाहन करतो की, राज ठाकरे यांना समर्थन द्या. प्राणी, झाड वाचवण्यासाठी हा मुद्दा घेत आहेत, असे जैन मुनींनी म्हटले. राज ठाकरेंच्या या मुद्द्याला माझा पाठिंबा आहे, राज ठाकरे जर मला बोलवत असतील तर मी कर्जतला जाण्याच्या तयारीत आहे. पशुपक्षांसाठी जर राज ठाकरे आंदोलन करत असेल तर त्या आंदोलनामध्ये मी त्यांच्यासोबत सहभागी होईल, असेही जैन मुनींनी म्हटले.




## मशिनमध्ये डोके अडकून २१ वर्षीय कामगाराचा मृत्यू

नाशिक : सातपूर औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीत काम करताना मशिनमध्ये डोके अडकून २१ वर्षीय कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. सुमीत रामदास सपकाळे (वय २१) असे मृत कामगाराचे नाव असून, या घटनेमुळे सातपूर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमीत सपकाळे हा मूळचा पाडळसा, तालुका यावल, जिल्हा जळगाव येथील रहिवासी होता. तो सध्या नाशिकमधील सिडको परिसरात उत्तमनगर येथे केएसडब्ल्यू कॉलेजसमोर राहत होता. सातपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमीत हा सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास कंपनीत कामावर गेला होता. कंपनीतील प्लांट क्रमांक २ मध्ये तो काम करत असताना सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास अचानक त्याचे डोके मशिनमध्ये अडकले. या दुर्घटनेत सुमीत गंभीर जखमी झाला. मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याची प्रकृती गंभीर बनली. अपघाताची माहिती मिळताच कंपनीतील प्रसाद शुक्ल यांनी सुमीतला तातडीने नाशिक जिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथे वैद्यकीय तपासणीनंतर डॉ. पाटील यांनी त्याला मृत घोषित केले. वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी कामगाराचा अशा प्रकारे मृत्यू झाल्याने कामगार वर्गातून हळहळ व्यक्त होत आहे.

## भाजप राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आजपासून गोव्यात; पक्षसंघटनेची बांधणी आणि आगामी आव्हानांवर होणार चर्चा

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**सिंधुदुर्गगोवा :** भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन दोन दिवसांच्या गोवा दौऱ्यावर येणार असून, या दौऱ्यात ते पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यासह विविध कार्यक्रमांत सहभागी होणार आहेत. आगामी राजकीय आव्हाने, पक्षसंघटनेची बांधणी आणि कार्यकर्त्यांची भूमिका या पार्श्वभूमीवर त्यांच्या दौऱ्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. या दौऱ्यात नबीन पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार असल्याची माहिती भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी दिली.

राष्ट्रीय अध्यक्षांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या संघटनात्मक हालचालींना वेग : भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन हे २७ आणि



२८ ऑक्टोबर रोजी दोन दिवसांच्या गोवा दौऱ्यावर येणार आहेत. राष्ट्रीय अध्यक्षांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या संघटनात्मक हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे. राज्यातील पक्षाची सद्यस्थिती, संघटनात्मक कामाचा आढावा, बूथस्तरावरील यंत्रणेची कार्यक्षमता आणि सरकारच्या विविध उपक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना यांसारख्या विषयांवर बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. पक्षाच्या स्थानिक नेतृत्वासह विविध स्तरांवरील पदाधिकारी या वेळी उपस्थित राहणार आहेत.

भाजपा कार्यकर्त्यांना संघटनात्मक कामासाठी नवी दिशा मिळणार : नितीन नबीन यांच्या मार्गदर्शनामुळे राज्यातील भाजपा कार्यकर्त्यांना संघटनात्मक कामासाठी नवी दिशा मिळेल, असा विश्वास पक्षाच्या नेत्यांकडून व्यक्त केला जात आहे. पक्षाची ताकद अधिक मजबूत करणे, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे आणि जनसंपर्क अधिक प्रभावी करण्यावर या दौऱ्यात भर दिला जाण्याची शक्यता आहे. दौऱ्यातील कार्यक्रमांचे नियोजन आणि बैठकींच्या माध्यमातून पक्षाच्या आगामी वाटचालीसंदर्भात चर्चा होणार आहे. राष्ट्रीय नेतृत्वाचा गोवा दौरा हा राज्यातील पक्षसंघटनेच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

## बुलढाणा जिल्ह्यात राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचा शुभारंभ

### मुख्य कार्यकारी अधिकारी भालचंद्र चव्हाण यांच्या हस्ते बालकांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप





निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** बालकांचे आरोग्य, पोषण आणि शारीरिक विकास सुधारण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ आज जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी, कोलवड येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भालचंद्र चव्हाण यांच्या हस्ते बालकांना जंतनाशक गोळ्या देऊन करण्यात आला.

राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील १ ते १९ वर्षे वयोगटातील बालकांना जंतनाशक गोळ्या देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. बालकांमधील आतड्यांतील जंतांचा प्रादुर्भाव कमी करणे, रक्तक्षयासारख्या समस्यांना प्रतिबंध करणे तसेच त्यांची पोषणस्थिती आणि शारीरिक वाढ सुधारण्याच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वपूर्ण आहे.

मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि महिला व बालविकास विभाग यांच्या समन्वयातून नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र बालकांपर्यंत जंतनाशक गोळ्यांचा लाभ पोहोचविण्यासाठी आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि शिक्षकांच्या माध्यमातून जनजागृती व आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

या शुभारंभप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रमोद येंडोले, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी राजू धुताडमल, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता नागलकर, बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री. गवळी, समुदाय आरोग्य अधिकारी अरुणदती ठोंबरे, आरोग्य सहाय्यक सुनीता जवंजाळ, तुळशिदास राजपूत, अरुण जाधव आणि गजानन साळोक यांच्यासह ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, आरोग्य विभागातील कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व पात्र बालकांनी राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचा लाभ घ्यावा. तसेच मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आरोग्य, शिक्षण आणि महिला व बालविकास विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परस्पर समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पिंपळनेरमध्ये मसाल्यांचा काळाबाजार उघड? ६०.८९ लाखांचा साठा जप्त; दोन परवाने निलंबित

## मसाल्यांच्या कारखान्यांत अस्वच्छता, कीटकांचा वावर! अन्न प्रशासनाची धडक कारवाई

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**देऊळगाव राजा :** सण-उत्सवांच्या काळात बाजारपेठेत विक्रीसाठी येणाऱ्या अन्नपदार्थांच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. देऊळगाव राजा तालुक्यातील पिंपळनेर येथे अन्न व औषध प्रशासनाने २५ ऑक्टोबर रोजी धडक कारवाई करत तब्बल ४७ हजार ८८५ किलो मसाल्यांचा, ६० लाख ८९ हजार ६४६ रुपये किमतीचा साठा जप्त केला. या कारवाईत दोन आस्थापनांच्या अन्न व्यवसाय परवान्यांचे निलंबन करण्यात आले. एका आस्थापनेत अस्वच्छता, मांजर, कबुतरे व कीटकांचा वावर, तर दुसऱ्या आस्थापनेत वैध परवान्याशिवाय व्यवसाय सुरू असल्यासह विविध त्रुटी आढळल्याने अन्नसुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

**अस्वच्छ वातावरणात मसाल्यांची निर्मिती आणि साठवणूक?**

पिंपळनेर येथील मे. जनता सेवा मिरची मसाला इंडस्ट्रीज या आस्थापनेच्या तपासणीदरम्यान अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या. परिसरात अस्वच्छता होती. मांजर, कबुतरे आणि कीटकांचा वावर आढळला, तर कीटक नियंत्रणाची योग्य व्यवस्था नसल्याचेही निदर्शनास आले.

कामगारांच्या वैद्यकीय तपासणीचा अभाव, अन्नपदार्थ थेट जमिनीवर ठेवणे आणि अन्नपदार्थांचे चाचणी अहवाल उपलब्ध नसणे, अशा बाबी तपासणीत समोर आल्या.

याशिवाय, 'गडच' ब्रँडच्या कांदा-लसूण मसाल्याच्या लेबलमध्ये दोष आढळले. तसेच कमी दर्जाचा असल्याच्या संशयावरून सुटी मिरची पावडर, हळद पावडर आणि अख्खी हळद यांचा साठा जप्त करण्यात आला. या आस्थापनेतून एकूण ४७ हजार ३८१ किलो मसाल्यांचा, ५७ लाख ९५ हजार ८४६ रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला. संबंधित अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत.

**परवानाधारक जागा बंद; दुसरीकडे व्यवसाय सुरू!**

मे. अनोखे फूड्स अँड स्पाइसेस या दुसऱ्या आस्थापनेच्या तपासणीतही नियमपालनाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या बाबी आढळल्या. परवाना असलेल्या गट क्रमांक ८१ येथील जागेवर कामकाज सुरू नसताना अन्य ठिकाणी वैध परवान्याशिवाय व्यवसाय सुरू असल्याचे निदर्शनास आले. अन्नपदार्थांचे चाचणी अहवालही उपलब्ध नव्हते. या आस्थापनेतून 'अनोखे' ब्रँडची २३८ किलो लाल मिरची पावडर, २०८ किलो हळद पावडर आणि ५८ किलो धने पावडर असा एकूण ५०४ किलो मसाल्यांचा, २ लाख ९३ हजार ८०० रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला.




**सणासुदीच्या काळात अन्नसुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

दोन्ही आस्थापनांमधून जप्त करण्यात आलेल्या मसाल्यांच्या साठ्याचे एकत्रित वजन ४७ हजार ८८५ किलो असून त्याची किंमत ६० लाख ८९ हजार ६४६ रुपये आहे. अन्न व औषध प्रशासनाने दोन्ही आस्थापनांचे अन्न व्यवसाय परवाने तत्काळ प्रभावाने निलंबित केले आहेत. ही कारवाई अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे आणि अमरावती विभागाचे सहआयुक्त (अन्न) एस. डी. केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली, बुलढाण्याचे सहायक आयुक्त (अन्न) प्र. शि. पाटील यांच्या निर्देशानुसार व उपस्थितीत अन्न सुरक्षा अधिकारी अ. सं. भोपाळे यांनी केली.

जप्त करण्यात आलेल्या अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी पाठविण्यात आले असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर निष्कर्षांच्या आधारे पुढील कारवाई करण्यात येणार आहे. सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी अशा तपासण्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. आता नमुना तपासणीच्या अहवालातून मसाल्यांच्या गुणवत्तेबाबत काय निष्पन्न होते, याकडे लक्ष लागले आहे.

## सहा लाख झाडांची कत्तल करून कसला 'ग्रीन' विकास?

सह्याद्रीच का लक्ष्य? टोरंट प्रकल्पासाठी एवढी घाई कशाची? पर्यावरणाच्या मुळावर घाव घालणाऱ्या निर्णयांबाबत सरकारने जनतेला स्पष्ट उत्तर द्यावे! विकासाच्या नावाखाली निसर्गाची कत्तल करायची आणि त्याच प्रकल्पाला 'ग्रीन' म्हणून मिरवायचे, हा कसला दुटप्पीपणा? सहा लाख झाडे तोडली जाणार असल्याचा मुद्दा उपस्थित झाला असताना टोरंट प्रकल्पाच्या पर्यावरणीय परिणामांकडे डोळेझाक करून चालणार नाही. आदित्य ठाकरे यांनी सरकारला विचारलेले प्रश्न केवळ राजकीय आरोप म्हणून झटकून टाकता येणार नाहीत. या प्रश्नांच्या केंद्रस्थानी सह्याद्रीचे अस्तित्व, पर्यावरणाचे भवितव्य आणि सरकारी निर्णयांची पारदर्शकता आहे. झाडे तोडायची आणि हरित विकासाच्या गप्पा मारायच्या! हरित विकासाचा अर्थ जंगलाचा विनाश नव्हे. पर्यावरणपूरक प्रकल्पाचा दावा करणाऱ्यांनी सर्वप्रथम आपल्या प्रकल्पामुळे निसर्गाचे किती नुकसान होणार आहे, याचा हिशेब जनतेसमोर ठेवला पाहिजे. सहा लाख झाडे तोडण्याचा दावा खरा असेल, तर ही केवळ वृक्षतोडीची आकडेवारी नाही; ती पर्यावरणीय परिणामांच्या गांभीर्याची घंटा आहे. मात्र, प्रत्यक्षात किती झाडे बाधित होणार, किती वृक्षतोडीला परवानगी मागितली आहे आणि अधिकृत अहवाल काय सांगतात, याची स्पष्टता सरकारने द्यावी. झाडे तोडून दुसरीकडे रोपे लावण्याचे पारंपरिक उत्तर आता पुरेसे नाही. दशकानुदशके वाढलेल्या वृक्षांची जागा काही रोपे एका दिवसात घेऊ शकत नाहीत. जंगल म्हणजे केवळ लाकूड किंवा झाडांची मोजदाद नव्हे; ते असंख्य जीवांचे घर, पाण्याचे नैसर्गिक चक्र आणि पर्यावरणीय संतुलनाचा आधार आहे. हा आधार उद्ध्वस्त करून प्रगतीचे आकडे मांडणे म्हणजे भविष्याच्या संकटाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यासारखे आहे. सह्याद्रीच का? पर्याय संपले की विवेक संपला? महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या सह्याद्रीच्या परिसरातच प्रकल्प उभारण्याचा आग्रह का? अन्य पर्यायी जागांचा सखोल अभ्यास झाला आहे का? पर्यावरणीय नुकसान कमी करण्यासाठी प्रकल्पाची रचना बदलण्याचा विचार केला आहे का? या प्रश्नांची उत्तरे मिळालीच पाहिजेत. उद्योगांना जागा देताना निसर्गाला बेदखल करण्याचा अधिकार कोणालाही नाही. गुंतवणूकदारांची सोय महत्त्वाची असेल, तर स्थानिक नागरिकांचे हित, जैवविविधतेचे संरक्षण आणि भावी पिढ्यांचे पर्यावरणीय हक्कही तितकेच महत्त्वाचे आहेत. सह्याद्रीचे जंगल एकदा नष्ट झाले, तर त्याची भरपाई कागदावरील आश्वासनांनी होणार नाही. त्यामुळे पर्यायी जागांचा अभ्यास आणि पर्यावरणीय परिणामांचे स्वतंत्र मूल्यमापन सार्वजनिक करणे ही सरकारची जबाबदारी आहे. घाई कोणासाठी? जनतेला अंधारात ठेवणार का? मोठे प्रकल्प म्हणजे मोठे निर्णय; आणि मोठ्या निर्णयांसोबत मोठी जबाबदारीही येते. मग प्रकल्पाबाबत एवढे प्रश्न उपस्थित होत असताना सरकारने प्रत्येक शंका दूर करण्यासाठी पुढाकार का घेऊ नये? पर्यावरणीय मंजुरी, वृक्षतोडीची परवानगी, जनसुनावणी, पर्यायी जागांचा अभ्यास आणि नुकसान भरपाईच्या उपाययोजना यांची संपूर्ण माहिती जनतेसमोर ठेवली पाहिजे. प्रकल्पाच्या वेळापत्रकाचा दबाव असला, तरी निसर्गाचे नुकसान भरून काढता येत नाही. त्यामुळे घाईच्या नावाखाली नियम आणि पर्यावरणीय निकष दुय्यम ठरवले जात आहेत का, याची स्वतंत्र तपासणी झाली पाहिजे. कोणत्याही अनियमिततेचा ठोस पुरावा असेल, तर जबाबदारी निश्चित करून कारवाई झाली पाहिजे. विकासाच्या नावाखाली कोणालाही प्रश्नांपासून सूट मिळू शकत नाही. सरकारने उत्तर द्यावे; घोषणांनी प्रश्न मिटणार नाहीत! टोरंट प्रकल्पामुळे रोजगार निर्माण होणार असतील, गुंतवणूक वाढणार असेल, तर त्याचे फायदे सरकारने आकडेवारीसह मांडावेत. पण त्याच वेळी पर्यावरणीय नुकसान किती होणार, ते कमी करण्यासाठी कोणते पर्याय तपासले, वृक्षतोड अपरिहार्य का आहे आणि पर्यावरणीय अटींचे पालन कोण करणार, याची उत्तरेही द्यावीत. केवळ प्रकल्पाच्या फायद्यांचे ढोल वाजवून त्याच्या संभाव्य हानीवर पडदा टाकता येणार नाही. आदित्य ठाकरे यांच्या प्रश्नांना राजकीय विरोध म्हणून बाजूला सारण्याऐवजी सरकारने तथ्यांच्या आधारे उत्तर द्यावे. सहा लाख झाडांच्या वृक्षतोडीचा दावा अधिकृत कागदपत्रांच्या आधारे स्पष्ट करावा. पर्यावरणीय अहवाल सार्वजनिक करावेत आणि सर्व शंका दूर होईपर्यंत संबंधित निर्णयांची पारदर्शक समीक्षा करावी, हीच जनहिताची अपेक्षा आहे. विकासाच्या नावाखाली सह्याद्रीची किंमत मोजली जाणार असेल, तर त्या विकासाच्या मॉडेलवर प्रश्न उपस्थित होणारच! महाराष्ट्राला उद्योग हवेत, रोजगार हवा, गुंतवणूक हवी; पण त्यासाठी निसर्गाचा बळी देणे अपरिहार्य आहे, असे कोणीही गृहीत धरू शकत नाही. सरकारने एक गोष्ट लक्षात ठेवावी–वृक्षतोडीची परवानगी हा पर्यावरणीय जबाबदारीतून सुटण्याचा परवाना नाही. 'ग्रीन' हा शब्द प्रकल्पाच्या नावात असण्यापेक्षा त्याच्या कृतीत दिसला पाहिजे. अन्यथा हरित विकासाच्या घोषणा आणि प्रत्यक्षातील पर्यावरणीय परिणाम यांच्यातील दरी जनतेसमोर उघडी पडेल. सह्याद्री वाचवणे ही विकासविरोधी भूमिका नाही; तर विकासाला विवेकाची मर्यादा घालण्याची मागणी आहे. झाडे तोडण्यापूर्वी सरकारने प्रत्येक पर्याय तपासावा, प्रत्येक प्रश्नाचे उत्तर द्यावे आणि पर्यावरणीय जबाबदारी निश्चित करावी. कारण प्रकल्प उभे करता येतात; पण उद्ध्वस्त झालेली निसर्गसंपदा पुन्हा उभी करणे कितीतरी पटींनी कठीण असते!

# उज्ज्वल निकमांनी केलं टोरेंट पॉवर प्रकल्पाचं समर्थन ; संजय राऊतांनी व्यक्त केला संताप; म्हणाले, १0 झाडं म्हणजे एक कसाब, अब्रुची लक्तरे

**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**



**मुंबई** : रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात प्रस्तावित असलेल्या टोरंट पॉवर कंपनीच्या जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पावरून राजकीय वातावरण तापलं आहे. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याचा आरोप करत विरोधक आणि पर्यावरणप्रेमींनी सरकारवर हल्लाबोल केला आहे. कर्जत येथील सायडोंगर आणि पाली खलाटी परिसरातील जंगलात टोरंट प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल केली जात असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थ आणि पर्यावरणप्रेमी केला आहे. अशातच, कर्जत पंप स्टोरेज प्रकल्प हा पर्यावरणाला पूरक असाच प्रकल्प असल्याचं मत ज्येष्ठ विधिज्ञ, विशेष सरकारी वकील आणि भाजपचे खासदार ॲड. उज्ज्वल निकम यांनी व्यक्त केलं आहे. तसेच कर्जत पंप स्टोरेज प्रकल्प वस्तुस्थिती देखील उज्जवल निकम यांनी मांडली आहे.

तर उज्ज्वल निकम यांनी कर्जत येथे होत असलेल्या वृक्षतोडीचं समर्थन केल्यानंतर आता ठाकरे गटाचे नेते आणि खासदार, संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला आहे. आम्हाला उज्जवल निकम यांच्याबद्दल आदर आहे. ते आमचे मित्र आहेत. पण त्यांनी एका खासदारकीसाठी अब्रूची लक्तरे काढली आहेत. १० झाड म्हणजे एक कसाब आहे. आम्ही झाडं आणि कसाब यांना एकात तागडीत तोलतो, असा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला आहे.

आज (मंगळवारी, ता २७) माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले, ३३,००० झाडं या पहिल्या टप्प्यात ते तोडणार आहेत. ३३,००० झाडं तोडणं म्हणजे संपूर्ण जंगल नष्ट करणं. तिथून भीमाशंकर वाईल्ड लाईफ हे २० किलोमीटरवरती आहे. त्यानंतर हे जे जंगल आहे साई जंगल, या जंगलामध्ये आदिवासी राहतात. जल, जमीन, जंगल ही आदिवासींची प्रॉपर्टी आहे. नरेंद्र मोदी म्हणतात, एक पेड माँ के नाम. कोणाची माँ? एक पेड माँ के नाम, मग त्या कातकऱ्यांनीच लावलेली झाडं आहेत ना ती, त्यांना आई नाही का? आई फक्त भाजपलाच आहे का? की आदाणीला आहे? की टोरंट कंपनीच्या मालकाला आई आहे? की माझा आईचं झाड आहे मी कापतो.

तिकडल्या स्थानिकांनी जे आम्हाला सांगितलं, की त्या डोंगरामध्ये अनेक वनस्पती आहेत. आणि वनस्पती कशा? की विष उतरवणारे. साप चावतो, विंचू चावतो, दमा होतो. तेव्हा ते विष उतरवण्यासाठी लोकं त्या गावात त्या देवळात येतात आणि मग ते लोकं वर्षानुवर्ष ज्यांची परंपरा आहे, त्या औषधी घेऊन ते विष उतरवतात आणि माणसांचे जीव वाचवतात. आता या सरकारनं, देवेंद्र फडणवीसांनी टोरंट कंपनीला परवानगी दिली गुजरातच्या, कुणीतरी मेहता शहा वगैरे आहेत आणि आख्ख जंगल त्यांच्या ताब्यात दिलं. महाराष्ट्रातली जंगलं नष्ट करायची, छत्रपती शिवाजी महाराजांच्या सह्याद्री पर्वताच्या रांगा नष्ट करायच्या आणि काय करायचं? तर हे मेहता, शाहांना द्यायचं. शेतकऱ्याने विरोध केला तर बंदूक रोखायची. रायगड जिल्ह्यातून हजारोच्या संख्येनं पोलीस तिथे आता उपस्थित राहिलेत. ग्रामस्थांना मारण्यासाठी. कडेकोट बंदोबस्त आहे. काल आमचं आणि आदित्य ठाकरेंचं बोलणं झालंय, गावकऱ्यांचं बोलणं झालंय. ही लढाई एवढ्यावर थांबणार नाही, राज ठाकरे उद्या चाललेले आहेत. इतर सुद्धा आता देशभरातले निसर्गप्रेमी आणि पर्यावरणवाद्यांनी आमच्याशी संपर्क केलाय, ते तिकडे येतील. बघूया हा प्रकल्प कसा होतोय, असंही पुढे संजय राऊतांनी म्हटलं आहे.

टोरंट कंपनीने स्पष्टीकरण दिलंय की, ६० वर्षांसाठीचा हा प्रकल्प असणार आहे, वन्यजीव संवर्धन वगैरे केलं जाणार आहे, यावर संजय राऊत म्हणाले की, कसं काय करणार? २०० वर्षाची, ३०० वर्षाची झाडं तोडायची आणि मग कुठेतरी रोपती लावायची. कुठे लावणार? जागा आहे कुठे? आरेमध्ये ३००० झाडं तोडली. तिकडल्या वन्यजीवांचं काय झालं? कुणी जाऊन पाहिलं का? रात्रीच्या काळोखात झाडं तोडली, आरेतली. आणि त्या झाडावरची घरटी, पक्षी, प्राणी रात्रभर आक्रोश करत होते. त्यांची अंडी, त्यांची पिल्लं छोटी छोटी छोटी रात्रभर तडफफडत होती. हे राक्षसी सरकार आहे. आतासुद्धा काल आम्ही जे ऐकलं, की जेव्हा ही झाडं तोडत होते, तेव्हा हजारो पोपट, मोर, इतर प्राणी आणि पक्षी तिथे तडफफडत होती, त्यांची घरं तुटली, त्यांची घरटी गेली, त्यांचा निवारा गेला. ते रात्रभर पुढे काही दिवस तिथे तडफफडत, फडफफडत होते. लाजा वाटत नाही का या सरकारला? देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सरकारला किंवा मोदी आणि त्यांच्या सरकारला लाज वाटत नाही? मुळात त्यांनी त्यांच्या खात्यातलं जे पर्यावरण मंत्रालय रद्द करावं, केंद्रानं आणि महाराष्ट्राने, असं म्हणत संजय राऊतांनी संताप व्यक्त केला आहे.

पुढे संजय राऊत म्हणाले, काही उपयोग नाहीये. फक्त डील करतात, पैसे खातात. उद्योगपतीकडून झाडं तोडण्याच्या मागे पैसे घेतात. हे चालणार नाही. टोरंट प्रकल्प महाराष्ट्रामध्ये उद्योग यायला हवेत. महाराष्ट्र हे औद्योगिक फ्रेंडली राज्य कायम राहिलं. यशवंतराव चव्हाणांच्या काळापासून या राज्यामध्ये उद्योग येत आहेत. हे आम्हाला मोदी आणि फडणवीसांच्याकडून शिकण्याची गरज नाही. ब्रिटिशांच्या काळात सुद्धा इथे उद्योग होते. या मुंबईमध्ये ३५० गिरण्या होत्या. औद्योगिक पट्टा होता हा सगळा. हे काय देवेंद्र फडणवीस आणि मोदींनी आणलेले उद्योग नव्हते. तुम्ही उद्योग बाहेर पळवले, तेव्हा आम्ही उद्योग आणतो ही शेखी मिरवू नका तुम्ही. या एमआयडीसी ज्या स्थापन केल्या, यशवंतराव चव्हाणांच्या काळात, शरद पवारांच्या काळात, नंतर म नोहर जोशींच्या काळात म्हणजे शिवसेनेच्या काळात, औद्योगिक प्रकल्प आम्ही आणलेले आहेत, तुम्ही काय करताय? तुम्हाला कोणाचीतरी इन्व्हेस्टमेंट काळा पैसा इथे गुंतवायचा आहे आणि तो मुख्यत्वे गुजरात मधून येतोय. बाकी काही नाहीये. हजारो लोक विरोध करतायत, असंही राऊतांनी म्हटलं आहे.

तिथे भूकंप होण्याची शक्यता भविष्यात वर्तवली आहे, त्या पाण्याच्या साठ्यांमुळे आणि त्यांची वकिली कोण करतंय? टोरंट कंपनीची आपण पाहिलं का आज? या देशातले महान वकील, ॲडव्होकेट उज्ज्वल निकम हे कष्टाकऱ्यांच्या बाजूने उभे राहिलेले नाहीयेत. हे गावकऱ्यांच्या बाजूने उभे राहिलेले नाहीयेत, ते महाराष्ट्राच्या जनतेच्या बाजूने उभे राहिलेले नाहीयेत. ते उभे राहिलेले आहेत, त्यांनी काय लिहिलंय ते, ते उभे राहिलेले आहेत टोरंट कंपनीच्या बाजूने. हा टोरंट प्रकल्प किती महान आहे आणि महाराष्ट्राला किती पर्यावरणपूरक आहे, हे सांगण्यासाठी स्वत: उज्ज्वल निकम उभे राहिलेले आहेत. हे महाराष्ट्राचं अत्यंत दुर्दैव आहे. भारतीय जनता पक्षात गेल्यावरती आपल्या आब्रुची कशी लक्तरं काढावी लागतात, बरं का, एका खासदारकीसाठी? उज्ज्वल निकम आमचे चांगले मित्र आहेत, आमच्या सद्भावना आहेत. पण ते ज्या पक्षात आहेत, तो राक्षसांचा पक्ष आहे. त्याच्यामुळे राक्षसी विचार त्यांच्या डोक्यात गेलेत. आणि जो मानवतावाद आतापर्यंत ते सांगत होते कसाबच्या प्रकरणामध्ये, अन्य प्रकरणांमध्ये, बॉम्बस्फोट प्रकरणामध्ये, १० झाडं तोडणं म्हणजे एक कसाब आहे, लक्षात ठेवा. कसाब आणि निसर्गाची हत्या किंवा निसर्गाचे हत्यारे हे एकाच तागडीमध्ये आम्ही तोलतो. तुम्ही २५०० झाडं तोडलेली आहात, ही झाडं तोडणारे कसाबचे बाप आहेत, हे उज्ज्वल निकम यांनी समजून घेतलं पाहिजे, असंही राऊतांनी म्हटलं आहेय

आता तिकडे विदर्भामध्ये चंद्रपूर भागाम ध्ये अदानीला खानी देत आहेत, ५००० झाडं तोडणार आहेत किंवा तुटली आहेत. छत्तीसगड, झारखंडमध्ये जंगलं नष्ट केली आहेत. किती काळे करणार? उज्ज्वल निकम यांच्यासारख्या वकिलांनी राक्षसांची बाजू घेऊन लढू नये. पर्यावरण नष्ट करणाऱ्यांच्या बाजूने उभं राहणं म्हणजे कसाबची बाजू घेणे आहे. बॉम्बस्फोटातल्या आरोपींची बाजू घेण्यासारखं आहे. हे मी त्यांना नम्रपणे सांगू इच्छितो. आम्हाला जास्त तोंड उघडायला लावू नका. तुम्ही स्वत:चे बेआबरू करून घेताय आणि भारतीय जनता पक्षाचे लोक अशा चांगल्या लोकांना वापरतायत, त्यांची बाजू मांडण्यासाठी, असंही पुढे संजय राऊतांनी म्हटलं आहे..

कर्जत तालुक्यामध्ये जसा टोरंट कंपनीचा प्रोजेक्ट आहे, तसा विदर्भामध्ये व्याघ्र कॉरिडॉर इथे अदानी पॉवर प्रोजेक्टला ती जागा किंवा तो प्रकल्प उभा करण्यासाठी जवळपास ५,००० झाडांची कत्तल करावी लागणार आहे, त्यावर संजय राऊत म्हणाले, पण त्यांनी करून दाखवावी ना कत्तल. बघा, अदानींनी या देशाच्या इभ्रतीची कत्तल केलेलीच आहे, जगभरामध्ये. देवेंद्र फडणवीस इतके हतबल का झालेत? विदर्भाची ओळख, ही जंगल आणि व्याघ्र प्रकल्प, याच्यामुळे विदर्भ देशात ओळखला जातो. तुम्ही अदानीसाठी व्याघ्र प्रकल्पावरती कुऱ्हाड चालवताय, झाडं जंगलांवरती कुऱ्हाड चालवताय, मुळात स्वत:ला विदर्भाचे सुपुत्र समजणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांनी तरी त्यांना विरोध करावा. माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार हे त्याच भागातले आहेत, त्यांनी आंदोलन उभं करावं, आम्ही येतो. ५,००० झाडं तुम्ही चंद्रपूर, गडचिरोलीतली तोडणार आहात, एका अदानीच्या फायद्यासाठी? असे अदानी नसलेले बरे या देशातले, अदानी का जन्माला आले? आणि आमच्याच देशात का जन्माला आले? महाराष्ट्रावरच का भार हा आमच्या? अत्यंत दु:खद अंत:करणाने आम्हाला हे सांगावं लागतंय, असे अदानी आम्हाला नको आहेत. आम्हाला टाटा पाहिजेत, आम्हाला बिर्ला पाहिजेत, आम्हाला किर्लोस्कर हवेत, आम्हाला महेंद्र हवेत, आम्हाला उद्योगपती हवेत, कोण म्हणतं नको आहे, या मुंबईचं वैभव हे उद्योगपतीने वाढवलंय, हे मी नाकारत नाही. हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका कायम राहिली की उद्योग राहिला पाहिजे, उद्योगपती जगला पाहिजे तर काम गार जगेल, असंही पुढे राऊत म्हणालेत.

# शबरी नॅचरल्सची भरारी थेट जागतिक व्यासपीठावर!

## – एका वेष्टनातून उमटली आदिवासी संस्कृतीची ओळख – 'मन की बात'मधून प्रधानमंत्री नरेंद्र मोदींकडून कौतुक

एखाद्या उत्पादनाचे पॅकेजिंग म्हटले की डोळ्यांसमोर उभे राहतात ते आकर्षक रंग, उठावदार अक्षरे आणि ग्राहकांचे लक्ष वेधून घेणारी रचना. पण एखाद्या उत्पादनाचे वेष्टन केवळ त्यातील वस्तूची ओळख करून देत नाही, तर एका समाजाची संस्कृती, परंपरा आणि जगण्याची गोष्टही सांगू शकते. याचे उदाहरण म्हणजे 'शबरी नॅचरल्स'.

महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीतील रंग, रेषा, कलापरंपरा आणि लोकजीवनाचे प्रतिबिंब आपल्या पॅकेजिंगमधून उमटवणाऱ्या या ब्रँडने आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली छाप सोडली आहे. जपानचा प्रतिष्ठित 'गुड डिझाईन अवॉर्ड' आणि 'इंडिया डिझाईन मार्क' मिळविणाऱ्या शबरी नॅचरल्सचा उल्लेख प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'च्या १३९ व्या भागात केला. त्यामुळे आदिवासी समाजाच्या पारंपरिक कला–कौशल्याला राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळाली आहे.

या यशामागची गोष्ट केवळ एका ब्रँडच्या लोकप्रियतेची नाही. ती आहे आपल्या सांस्कृतिक वारशाला आधुनिक बाजारपेठेशी जोडण्याची, दुर्गम भागांतील उत्पादकांना नव्या ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची आणि परंपरेला आर्थिक सामर्थ्याची जोड देण्याची.



**वेष्टनावर रेखाटलेला संस्कृतीचा वारसा**

महाराष्ट्रातील वारली चित्रकला असो, गोंड कलेतील वैशिष्ट्यपूर्ण आकृतिबंध असोत किंवा चित्रकथी परंपरेतील कथनशैली असो; या कलांमध्ये केवळ सौंदर्य नाही, तर समाजाच्या जगण्याचा, निसर्गाशी असलेल्या नात्याचा आणि पिढ्यान्पिढ्या जपलेल्या सांस्कृतिक स्मृतींचा ठेवा आहे.

शबरी नॅचरल्सच्या पॅकेजिंगमधून हाच ठेवा ग्राहकांसमोर येतो. एरवी एखादे उत्पादन खरेदी करताना ग्राहक त्याची गुणवत्ता, किंमत किंवा उपयोगिता पाहतो. मात्र, त्याच उत्पादनाच्या वेष्टनावर एखाद्या प्रदेशाची कलापरंपरा दिसली, तर त्या वस्तूला सांस्कृतिक संदर्भही प्राप्त होतो. उत्पादन आणि संस्कृती यांच्यातील हा दुवा शबरी नॅचरल्सच्या उपक्रमाचे वेगळेपण अधोरेखित करतो.

या संकल्पनेमुळे आदिवासी कला ही केवळ प्रदर्शनांपुरती किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांपुरती मर्यादित राहत नाही. ती दैनंदिन जीवनातील वस्तूंमधून ग्राहकांपर्यंत पोहोचते. अशा प्रकारे पॅकेजिंग हे केवळ विक्रीचे साधन न राहता सांस्कृतिक ओळखीचे माध्यम बनते.

**स्थानिक कौशल्याला जागतिक बाजारपेठेची जोड**

शबरी नॅचरल्स हा ब्रँड महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत विकसित करण्यात आला आहे. आदिवासी समाजातील पारंपरिक कौशल्ये, नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारित उत्पादने आणि स्थानिक उद्योजकतेला बाजारपेठ उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे.

आदिवासी समाजात अनेक पिढ्यांपासून हस्तकला, वनउपज संकलन, नैसर्गिक उत्पादनांची निर्मिती आणि शेतीशी संबंधित कौशल्ये जपली गेली आहेत. मात्र, या कौशल्यांना व्यापक बाजारपेठ मिळवून देणे हे अनेकदा मोठे आव्हान ठरते. उत्पादन तयार करण्याचे कौशल्य असूनही त्याचे आकर्षक सादरीकरण, योग्य विपणन, वितरण आणि ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची साधने उपलब्ध नसल्यामुळे उत्पादकांना मर्यादित बाजारपेठेवर अवलंबून राहावे लागते.

शबरी नॅचरल्सच्या माध्यमातून या अंतरावर मात करण्याचा प्रयत्न होत आहे. दर्जेदार उत्पादनांसोबत सांस्कृतिक वैशिष्ट्ये जपणारे पॅकेजिंग, डिजिटल विक्रीची साधने आणि कॉर्पोरेट क्षेत्राशी जोडलेली बाजारपेठ अशा विविध मार्गांनी आदिवासी उत्पादनांना नवी ओळख देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**जंगल, बांबू, मोह आणि स्थानिकांचा जीवनानुभव**

शबरी नॅचरल्सच्या उत्पादनविश्वात नैसर्गिक व कृषी उत्पादने, बांबूपासून तयार केलेल्या हस्तकला वस्तू आणि मोहापासून तयार केलेल्या वस्तूंचा समावेश आहे. या उत्पादनांमागे केवळ कच्च्या मालाचा वापर नाही, तर स्थानिक संसाधनांचे ज्ञान, पारंपरिक कौशल्य आणि निसर्गाशी जोडलेले जीवनानुभव आहेत.

बांबूच्या वस्तू तयार करणाऱ्या कारागिरांसाठी त्यांच्या कौशल्याला बाजारपेठ मिळणे म्हणजे अधिक ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी. नैसर्गिक उत्पादने तयार करणाऱ्या महिला बचत गटांसाठी ही संधी म्हणजे आपल्या श्रमांना व्यापक आर्थिक मूल्य मिळण्याची शक्यता. कृषी आणि वनउपजांशी संबंधित उत्पादकांसाठीही अशा ब्रँडमुळे विक्रीचे नवे मार्ग खुले होऊ शकतात.

**डिजिटल जगाशी जोडलेली आदिवासी उद्योजकता**

पूर्वी दुर्गम भागांत तयार होणाऱ्या वस्तूंची विक्री प्रामुख्याने स्थानिक बाजारपेठांपुरती मर्यादित राहण्याची शक्यता होती. आज ई–कॉमर्स आणि मोबाईल तंत्रज्ञानामुळे हे चित्र बदलण्याची संधी निर्माण झाली आहे.

शबरी नॅचरल्सने ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि स्वतंत्र मोबाईल प्लिकेशनच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग स्वीकारला आहे. यामुळे स्थानिक उत्पादनांना भौगोलिक मर्यादा ओलांडून ग्राहक मिळवण्याची संधी उपलब्ध होते.

याशिवाय कॉर्पोरेट गिफ्टिंग हा विक्रीचा आणखी एक महत्त्वाचा मार्ग ठरत आहे. कंपन्या आणि विविध संस्था सण, समारंभ किंवा विशेष प्रसंगी भेटवस्तू देतात. अशा वेळी बांबू हस्तकला, नैसर्गिक उत्पादने आणि स्थानिक वैशिष्ट्ये जपणाऱ्या वस्तूंचे आकर्षक भेटसंच ग्राहकांना उपलब्ध करून देता येतात. त्यातून आदिवासी उत्पादनांना संस्थात्मक ग्राहक मिळू शकतात.

**पुरस्कारांपलीकडचे खरे यश**

'गुड डिझाईन अवॉर्ड' आणि 'इंडिया डिझाईन मार्क' या सन्मानांमुळे शबरी नॅचरल्सच्या पॅकेजिंगला प्रतिष्ठा मिळाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मधून केलेल्या उल्लेखामुळे या उपक्रमाकडे देशाचे लक्ष वेधले गेले. महाराष्ट्राच्या आदिवासी कला आणि उत्पादनांसाठी ही निश्चितच महत्त्वाची बाब आहे.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी या गौरवामुळे आदिवासी बांधवांच्या विकासासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना राष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन मिळाल्याची भावना व्यक्त केली आहे. आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड यांनीही आदिवासी संस्कृती, परंपरा आणि कलाकृतींना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक सहकार्य मिळावे, असे आवाहन केले आहे.

आदिवासी कला ही केवळ बाजारात विकली जाणारी सजावटीची गोष्ट नाही. ती एका समाजाच्या इतिहासाची, अनुभवांची आणि सांस्कृतिक अस्मितेची अभिव्यक्ती आहे. तिचे व्यावसायिक सादरीकरण करताना या अस्मितेचा आदर राखणे, कलाकारांना योग्य मानधन देणे आणि त्यांच्या कौशल्याचे श्रेय त्यांच्यापर्यंत पोहोचवणेही तितकेच आवश्यक आहे.

**एका ब्रँडची गोष्ट, अनेक शक्यतांची सुरुवात**

शबरी नॅचरल्सच्या पॅकेजिंगमधून आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडते, ही या उपक्रमाची आकर्षक बाजू आहे. पण त्यामागील मोठी शक्यता अधिक महत्त्वाची आहे. स्थानिक कला, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि पारंपरिक कौशल्य यांना आधुनिक डिझाईन, डिजिटल तंत्रज्ञान आणि व्यापक बाजारपेठ यांची जोड दिली, तर ग्रामीण आणि आदिवासी अर्थव्यवस्थेसाठी नवे मार्ग निर्माण होऊ शकतात.

महाराष्ट्राच्या आदिवासी भागांमध्ये अशी अनेक कौशल्ये आणि उत्पादने आहेत, ज्यांना योग्य बाजारपेठ, ब्रँडिंग आणि वितरण व्यवस्था मिळाल्यास व्यापक ग्राहकवर्गापर्यंत पोहोचता येईल. शबरी नॅचरल्सचा अनुभव अशा प्रयत्नांसाठी दिशादर्शक ठरू शकतो.

एका उत्पादनाच्या वेष्टनावर उमटलेल्या रेषा आता आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जाणाऱ्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक बनल्या आहेत. या रेषांमध्ये वारली आणि गोंड कलेचे सौंदर्य आहे, परंपरेचे सातत्य आहे आणि आर्थिक स्वावलंबनाची आशाही आहे.

या आशेचे रूपांतर आदिवासी समाजाच्या प्रत्यक्ष प्रगतीत झाले, तर शबरी नॅचरल्सचे यश केवळ पुरस्कारांपुरते मर्यादित राहणार नाही. ते परंपरेला आधुनिकतेशी जोडून विकासाचा नवा मार्ग शोधणाऱ्या असंख्य आदिवासी कारागिरांच्या, शेतकऱ्यांच्या आणि महिलांच्या आयुष्यात बदल घडवणारी कहाणी बनेल.

**अश्विनी पुजारी**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**मुंबई.**

दैनिक निशस्त्र योद्धा हे पत्र मालक, प्रकाशक सुबोध केशवराव आखाडे यांनी मुद्रक लिंमरा प्रिंटिंग प्रेस मुद्रण स्थळ मलकापूर जिल्हा बुलढाणा (महा) येथून मुद्रित करून दैनिक निशस्त्र योद्धा कार्यालय डोणगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा (४४३३०३) येथून प्रकाशित केले. संपादक सुबोध केशवराव आखाडे मो.९०२८४००७७७ प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी आर बी ॲक्ट नुसार मुद्रक व संपादक जबाबदार राहतील असे नाही.) (सर्व वाद विवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत राहतील.) RNI MHMAR/26/A1288

Printed at Limra Printing Press, Malkapur, District Buldhana (Maharashtra) and Published by Subodh Keshavrao Akhade on behalf of Daily Nishastra Yoddha, Published from Daily Nishastra Yoddha Office, Dongaon, Taluka Mehkar, District Buldhana – 443303 (Maharashtra). Editor: Subodh Keshavrao Akhade. Mobile: +91 9028400777. The views expressed in the articles and news published are not necessarily those of the Editor. As per the PRB Act, the Printer and Editor shall not be held responsible for the same. All disputes are subject to Mehkar Court jurisdiction only.

## विविध वृत्त...

### बहापुरा येथे जुगार अड्ड्यावर धाड; ३३ हजारांच्या मुद्देमालासह चौघे ताब्यात

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मलकापूर :** तालुक्यातील बहापुरा येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर मलकापूर शहर पोलिसांनी धाड टाकून ३३ हजार ५५० रुपयांच्या मुद्देमालासह चार जणांना रंगेहात पकडले. ही कारवाई २६ ऑक्टोबर रोजी केली. बहापुरा येथे काही जण अवैध जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून मलकापूर शहर पोलीस स्टेशनचे कर्मचारी रहीम खान हमीद खान पठाण यांनी पंचासमक्ष घटनास्थळी छापा टाकला. या कारवाईत आरोपी प्रकाश अशोक वानखेडे (वय ३१) रा.बहापुरा, प्रमोद बळीराम राऊत (वय ३०) रा. पान्हेरा, अनिल निनाजी गोडे (वय ५६) रा. बहापुरा, प्रशांत दामाजी इंगळे (वय २८) रा.बहापुरा आणि इतर ३ ते ४ जण जुगार खेळताना मिळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून रोख ८४० रुपये आणि आरोपींच्या अंगझडतीत मिळालेले ३२ हजार ७१० रुपये असा एकूण ३३ हजार ५५० रुपयांचा जुगार मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलीस कर्मचारी रहीम खान पठाण यांच्या तक्रारीवरून मलकापूर शहर पोलीस स्टेशनला अप.क्र. ८२७/२०२६, कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### चहाच्या पैशावरून हॉटेल कर्मचाऱ्यावर फायटरने हल्ला; गुन्हा दाखल

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मलकापूर :** मलकापूर ते मुक्ताईनगर रोडवरील कोलते कॉलेजसमोर असलेल्या एका चहाच्या हॉटेलवर नाश्त्याचे पैसे मागितल्याच्या कारणावरून एका तरुणावर फायटरने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी मलकापूर शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी मुस्तकीन मोहम्मद महमुद (वय १८) रा. फातेमा नगर, मलकापूर हा एका चहाच्या हॉटेलवर काम करतो. २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते ११:३० वाजेच्या दरम्यान आरोपी उज्वल सिध्दार्थ नरवाडे उर्फ चिक्या रा.म्हाडा कॉलनी, मलकापूर हा त्या हॉटेलवर आला आणि त्याने नाश्ता केला. यानंतर फिर्यादीने त्याच्याकडे नाश्त्याचे पैसे मागितले असता, आरोपीने माझ्याकडे पैसे नाही आहेत, तुला काय करायचे ते तू करून घे, असे म्हणत फिर्यादीला शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. एवढेच नव्हे तर, आरोपीने त्याच्या हातातील फायटर थेट फिर्यादीच्या डाव्या गालावर मारून त्याला गंभीर जखमी केले. या हल्ल्यात फिर्यादीच्या गालावर दुखापत होऊन रक्तस्राव झाला. घटनेनंतर परिसरातील कोलते कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी तत्परता दाखवत जखमी मुस्तकीन याला उपचारासाठी तातडीने कोलते हॉस्पिटलमध्ये दाखल केले. या प्रकरणी फिर्यादी मुस्तकीन महमुद याच्या तक्रारीवरून मलकापूर शहर पोलीस स्टेशनला अप.क्र. ८२३/२०२६, कलम ११८(१), ३५१(२), ३५२ बीएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कुणाल जाधव करत आहेत.

### धानोरा शिवारातून ३८ हजारांच्या तीन गाईंची चोरी; मलकापूर ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मलकापूर :** तालुक्यातील धानोरा (वि.) शिवारात अज्ञात चोराने शेतातील टिनशेडमध्ये बांधलेली ३८ हजार रुपये किमतीची ३ गोधने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनला अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाघुळ येथील रहिवासी विशाल सुधाकर सातव (वय ३२) यांचे धानोरा (वि.) शिवारात गट क्रमांक १०७ मध्ये शेत आहे. त्यांनी आपल्या शेतातील टिनशेडमध्ये जनावरे बांधून ठेवली होती. दरम्यान २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६:३० वाजेपासून ते २६ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजेच्या दरम्यान अज्ञात चोराने संधी साधून १५ हजार रुपये किमतीची जर्शी गाय, १८ हजार रुपये किमतीची लाल रंगाची गावरान गाय आणि ५ हजार रुपये किमतीची लाल रंगाची गावरान वासरी अशी एकूण ३८ हजार रुपये किमतीची तीनही जनावरे चोरून नेली. याप्रकरणी दिलेल्या तक्रारीवरून मलकापूर ग्रामीण पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूध्द अप.क्र.२१९/२०२६, कलम ३०३(२) बीएनएस नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकॅ रघुनाथ जाधव करीत आहेत.

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी लावणी कलाकारांकडून एक लाख रुपयांचा निधी सुपूर्द

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये योगदान देण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी सुरू केलेल्या उपक्रमाला कलाकार आणि सांस्कृतिक संस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमांतर्गत लावणी कलाकारांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक लाख रुपयांचा निधी दिला असून, या रकमेचा धनादेश आज सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर यांनी हा धनादेश मंत्री शेलार यांच्याकडे सुपूर्द केला.

सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या आवाहनानुसार, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीची नाट्यगृहे सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या माध्यमातून विविध कलाकार आणि सांस्कृतिक संस्था कार्यक्रमांचे आयोजन करून मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी योगदान देत आहेत. कलाकारांच्या कलागुणांना सामाजिक कार्याची जोड देत दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी योगदान देण्याची संधी या उपक्रमातून उपलब्ध झाली आहे. लावणी, संगीत, नृत्य, नाटक आणि हिंदी चित्रपटगीतांवर आधारित कार्यक्रमांच्या माध्यमातून निधी संकलन करण्यात येत आहे. विविध क्षेत्रांतील नामवंत कलाकारांनी या उपक्रमात सहभाग नोंदविण्याची तयारी दर्शविल्याने सांस्कृतिक क्षेत्रातून या सामाजिक कार्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात पाणीसाठ्याची चिंता; खडकपूर्णाचा उपयुक्त साठा शून्यावर!

## जिल्ह्यातील प्रकल्पांत ५२.६८ टक्के पाणी; टंचाई टाळण्यासाठी नियोजनाची गरज

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी





**बुलढाणा :** जिल्ह्यातील जलसाठ्याची स्थिती लक्ष वेधून घेत असून, काही प्रकल्पांमध्ये समाधानकारक पाणीसाठा असला तरी खडकपूर्णा प्रकल्पाचा उपयुक्त साठा शून्यावर पोहोचला आहे. पाटबंधारे विभागाच्या बुधवारच्या सकाळी ७ वाजताच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील सर्व प्रकल्पांत मिळून २४४.८४० दशलक्ष घनमीटर म्हणजेच ५२.६८ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे पिण्याचे पाणी आणि सिंचनासाठी उपलब्ध साठ्याचे काटेकोर नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

मोठ्या प्रकल्पांमध्ये उपयुक्त पाणीसाठा केवळ ४३.४६ टक्के असल्याचे आकडेवारीतून दिसून येते. नळगंगा प्रकल्पात ७६.१८ टक्के, तर पेनटाकळी प्रकल्पात ७३.३२ टक्के पाणीसाठा आहे.

दुसरीकडे, खडकपूर्णा प्रकल्पात ६२.८६४५ दशलक्ष घनमीटर मृतसाठा शिल्लक असून, उपयुक्त साठा संपला आहे. जिल्ह्यातील सात मध्यम प्रकल्पांत ७०.७३ टक्के साठा उपलब्ध आहे. पलढग प्रकल्पात ९८ टक्के, ज्ञानगंगा प्रकल्पात ९५.९९ टक्के आणि उतावळी प्रकल्पात ८७.८२ टक्के पाणीसाठा आहे. मात्र, तोरणा प्रकल्पात २९.५३ टक्के आणि मन प्रकल्पात ४१.८१ टक्के साठा असल्याने सर्वच प्रकल्पांची स्थिती समाधानकारक नाही. जिल्ह्यातील ४२ लघु प्रकल्पांत ४८.८६ टक्के पाणीसाठा आहे.

बुलढाणा शहरासाठी महत्त्वाच्या येलगाव धरणात ७७.४२ टक्के साठा उपलब्ध असल्याने काहीसा दिलासा मिळाला आहे. तथापि, उपलब्ध पाणी किती काळ पुरेल, याचा विचार करून प्रशासनाने प्रकल्पनिहाय पाणीवापराचे नियोजन करणे आवश्यक आहे. पाण्याचा अपव्यय रोखणे, वितरणातील गळती कमी करणे आणि सिंचनाचे नियोजन करणे यावर भर दिल्यास संभाव्य टंचाईचा सामना करण्यास मदत होऊ शकते.

## कर्जमाफी होऊन सुद्धा शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज देण्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँक व्यवस्थापकाची टाळाटाळ

### आठ दिवसांत शेतकऱ्यांना कर्ज न दिल्यास बॅंकेला ताला ठोकोचा शिवसेना (उबाठा)चा इशारा



निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मलकापूर :** तालुक्यातील भानगुरा येथील शेतकऱ्यांना पहिल्या यादीत कर्जमाफी होऊन सुद्धा नवीन पिक कर्जासाठी गेल्या दोन महिन्यापासून महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा व्यवस्थापक नवीन पीक कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्याने शेतकऱ्यांनी याबाबतची माहिती शिवसेना उपजिल्हाप्रमुख (उद्धवसाहेब ठाकरे) गजानन ठोसर, स्वाभिमानी शेतकरी संघटना युवक जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे यांना दिली.

नवीन पिक कर्जासाठी आज भानगुरा येथील सर्व शेतकऱ्यांना घेऊन गजानन ठोसर, निलेश नारखेडे यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँक व्यवस्थापक आदित्य सिंग यांना शेतकऱ्यांना त्रास कां देत असल्याचा जाब विचारला व आठ दिवसात अर्ज करणाऱ्या सर्व संबंधित शेतकऱ्यांना पीक कर्ज न दिल्यास सोमवार दि.०२ नोव्हेंबर २६ रोजी बँकेला ताला ठोको आंदोलन करण्याचा इशारा दिला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, स्वाभिमानी शेतकरी युवा जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे, सतीश पाटील, प्रभाकर जावरे, गजानन बावस्कर, राजू रायपुरे, गोदावरी वराडे, संतोष पाटील, अशोक पाटील, गीताबाई टकले, दिलीप काचकुटे, कैलास पटेल, ज्ञानदेव चोपडे, ध्रुव पटेल, पुंजाजी पाटील, ज्ञानेश्र्वर गावंडे, भागवत पाटील, सुरेश पाटील, सह इतर शेतकरी उपस्थित होते.

### एसटी कर्मचाऱ्यांसाठी मोठी बातमी! दिवाळीपूर्व वेतनासाठी शासनाकडून ३९१ कोटींचा निधी मंजूर

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी वेतन मिळण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाला सप्टेंबर २०२६ मधील प्रवासी सवलतींच्या प्रतिपूर्तीपोटी ३९१.०२ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय २७ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी करण्यात आला. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी यासाठी पाठपुरावा केला होता. एसटी महामंडळातील सुमारे ८३ हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे वेतन साधारणपणे दर महिन्याच्या ७ ते १० तारखेदरम्यान दिले जाते. यंदा दिवाळीपूर्वीच कर्मचाऱ्यांना वेतन मिळावे, यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार परिवहन विभाग आणि एसटी प्रशासनाने शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध करून घेण्यासाठी पाठपुरावा केला. आता निधी वितरणास मंजुरी मिळाल्याने दिवाळीपूर्व वेतन देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्ष वेतन जमा होण्याची तारीख एसटी प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीवर अवलंबून असेल. एसटी महामंडळाकडून महिला सन्मान योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या सवलती आणि इतर प्रवासी सवलत योजनांची अंमलबजावणी केली जाते. या योजनांमुळे महामंडळावर आर्थिक भार येतो. शासनाकडून या सवलतींच्या प्रतिपूर्तीची रक्कम वेळेवर मिळाल्यास महामंडळाच्या आर्थिक नियोजनाला मदत होते. सप्टेंबर २०२६ मधील प्रवासी सवलतींच्या प्रतिपूर्तीपोटी मंजूर झालेला ३९१.०२ कोटी रुपयांचा निधी महामंडळाच्या आर्थिक व्यवहारांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

## जिल्ह्यात २८ व २९ ऑक्टोबरला तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता

### हवामान अंदाजाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना कृषी विज्ञान केंद्राचा सल्ला

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** भारतीय हवामान विभागाने वर्तविलेल्या पाच दिवसीय हवामान अंदाजानुसार, 'अर्णब' चक्रीवादळाच्या प्रभावामुळे बुलढाणा जिल्ह्यात २८ व २९ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. तर ३० व ३१ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यात हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे. या कालावधीत काही ठिकाणी आकाश मुख्यतः निरभ्र ते अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या संभाव्य हवामान बदलाच्या पार्श्र्वभूमीवर शेतकऱ्यांनी पिकांची आणि काढणी केलेल्या शेतमालाची योग्य काळजी घ्यावी, असे आवाहन ग्रामीण कृषी मौसम सेवा, जिल्हा कृषी हवामान केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांसाठी कृषी सल्ला : तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता लक्षात घेता, शेतकऱ्यांनी काढणी केलेला शेतमाल सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी साठवून ठेवावा. ओलीताखालील करडीची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या शेवटपर्यंत करता येईल. पेरणीपूर्वी बियाणे रात्रभर पाण्यात भिजवून घेतल्यास त्याची उगवण लवकर आणि चांगली होण्यास मदत होते. रब्बी पिकांची पेरणी करताना लवकर परिपक्व होणाऱ्या आणि पाण्याचा ताण सहन करू शकणाऱ्या वाणांची निवड करावी. एल निनो सदृश परिस्थिती लक्षात घेता, पाण्याची गरज कमी करण्यासाठी फळझाडांच्या सुकलेल्या, रोगट आणि अतिरिक्त फांद्या काढून टाकाव्यात. यामुळे उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यास मदत होईल.

जनावरांना केवळ वाळलेला चारा दिल्याने जनावरांच्या सर्व पोषणविषयक गरजा पूर्ण होत नाहीत. त्यामुळे जनावरांचे वय, वजन, दूध उत्पादन आणि शारीरिक अवस्था लक्षात घेऊन आहाराचे नियोजन करावे. आवश्यकतेनुसार संतुलित पशुखाद्य, खनिज मिश्रण आणि मीठ द्यावे. शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजानुसार शेतीविषयक कामांचे नियोजन करून पिके, शेतमाल आणि पशुधनाची योग्य काळजी घ्यावी, असे कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने सुचविण्यात आले आहे.

## मला अस्वस्थ वाटतंय, गाडीत झोपतो, पोलीस स्टेशनला निघालेल्या सीनियर पीआयला हृदविकाराचा धक्का, गाडीतच मृत्यू!

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** पोलीस खात्यातील एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचा कर्तव्यावर असताना अचानकपणे मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मुंबईतील कुरार पोलीस स्टेशनमधील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशील कुमार गायकवाड यांनी काल संध्याकाळी डीसीपी (पोलीस उपायुक्त) यांचा वाढदिवस साजरा केला. त्यानंतर, सकाळी घरातून कामावर येताना गाडीमध्येच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. विशेष म्हणजे, एकाच महिन्यात दोन वरिष्ठ पोलीस निरीक्षकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने पोलीस खात्यात खळबळ उडाली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विरोधात पोलीस दलात मोठी नाराजी असल्याची चर्चा पोलीस वर्तुळात आहे.

मुंबईच्या कुरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशील कुमार गायकवाड यांचे कर्तव्यावर येत असताना दुर्दैवी मृत्यू झाला आहे. नवी मुंबई उलवे येथील आपल्या राहत्या घरातून कर्तव्यावर निघाले असताना पोलीस ठाण्यात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्यामुळे पोलीस दलात शोककळा पसरली असून कामाच्या ताण आणि वरिष्ठांचा दबाव यामुळे हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाल्याची चर्चा पोलीस दलात सुरू झाली आहे. याच महिन्याच्या सुरुवातीला पोलीस दलात कार्यरत असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी जाधव यांचा देखील दुर्दैवी मृत्यू झाला होता.

अवघ्या सात महिन्यापूर्वी दोन्ही पोलीस अधिकाऱ्यांचे पोलीस निरीक्षक पदावरुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक या पदावर पदोन्नतीने प्रमोशन झाले होते. सुशील कुमार गायकवाड हे काल पोलीस उपयुक्त गजानन राजमाने यांचा वाढदिवस साजरा करुन घरी नवी मुंबई उलवे येथे गेले होते. मात्र, आज सकाळी कर्तव्यावर येत असताना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांनी आपल्यासोबत असणाऱ्या ड्रायव्हर आणि ऑपरेटरला याबाबत माहिती दिली.

## डोणगाव ग्रामपंचायत अधिकारी निलंबित!

### बस स्थानकाशेजारील अतिक्रमण प्रकरणी देवेंद्र आखाडे यांची तक्रार चर्चेत; प्रशासकीय चौकशी अहवालानंतर कारवाई

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मेहकर :** मेहकर तालुक्यातील डोणगाव ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी विजय केशवराव दांडगे यांच्यावर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पंचायत समिती मेहकरच्या गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी) यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी यासंदर्भातील आदेश जारी केला आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या युवा आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष देवेंद्र आखाडे यांनी केलेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर हे प्रकरण चर्चेत आले आहे. डोणगाव बसस्थानक परिसरातील वादग्रस्त अतिक्रमणाचा प्रश्न गेल्या काही काळापासून ऐरणीवर होता. संबंधित अतिक्रमण हटविण्याबाबत आदेश होऊनही प्रत्यक्षात अतिक्रमण हटविण्यात आले नसल्याचा आरोप तक्रारीतून करण्यात आला होता. तसेच अतिक्रमणधारकाला पाठीशी घातले जात असल्याचाही आरोप करण्यात आला होता.

या प्रकरणी देवेंद्र आखाडे यांनी तक्रार करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. दरम्यान, पंचायत समिती मेहकरच्या निलंबन आदेशात ग्रामपंचायतीचे कामकाज नियमानुसार न करणे, वरिष्ठांच्या आदेशांचे पालन न करणे तसेच ग्रामपंचायतीच्या करवसुलीच्या रकमेसंदर्भातील व्यवहारांबाबत आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

जिल्हास्तरीय समितीच्या चौकशी अहवालासह कारणे दाखवा नोटिशीचाही आदेशात संदर्भ देण्यात आला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ मधील नियम ३ तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ मधील संबंधित तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आल्याचे आदेशात नमूद आहे.

तथापि, बसस्थानकावरील अतिक्रमण प्रकरण हेच निलंबनाचे एकमेव किंवा थेट कारण असल्याचे आदेशातून स्पष्ट होत नसल्याने या दोन्ही बाबी स्वतंत्रपणे पाहणे आवश्यक आहे.

दरम्यान, बसस्थानकावरील अतिक्रमणाबाबत नेमके कोणते आदेश देण्यात आले होते, त्यांची अंमलबजावणी का झाली नाही आणि यासंदर्भात कोणाची जबाबदारी होती, याची स्पष्ट चौकशी करून नियमानुसार पुढील कारवाई करावी, तसेच सक्षम प्राधिकरणाच्या आदेशानुसार सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त करावी, अशी मागणी देवेंद्र आखाडे यांनी केली आहे.

शासकीय आदेशांची वेळेत अंमलबजावणी, सार्वजनिक जागांचे संरक्षण आणि ग्रामपंचायत प्रशासनाचे पारदर्शक कामकाज यांना प्राधान्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शासकीय आदेश केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात अंमलात यावेत आणि सार्वजनिक हिताच्या प्रश्नांवर प्रशासनाची जबाबदारी निश्चित व्हावी, अशी भूमिका क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या युवा आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष देवेंद्र आखाडे यांनी मांडली आहे.

## मलकापूर येथे मैढ क्षत्रिय सुवर्णकार समाजातर्फे श्री महाराजा अजमीढजी जयंती उत्साहात साजरी; विविध गुणवंतांचा गौरव

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मलकापूर :** येथील सारथी हॉटेलमध्ये मलकापूर मैढ क्षत्रिय सुवर्णकार समाजाच्या वतीने कुलदैवत श्री महाराजा अजमीढजी यांचा बुलढाणा जिल्हा जयंती महोत्सव अत्यंत उत्साहात आणि दिमाखात आयोजित करण्यात आला होता. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष कैलासजी वर्मा यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या जिल्हास्तरीय सोहळ्यात संपूर्ण जिल्ह्यातून सुमारे ३०० समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

या कार्यक्रमाची सुरुवात महाराजा श्री अजमीढजी यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. या प्रसंगी समाजातील ज्येष्ठ नागरिक, शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय प्रावीण्य मिळवलेले प्रतिभावान विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा स्मृतीचिन्ह (मोमेंटो) देऊन विशेष सत्कार करण्यात आला. समाजाच्या विकासाला गती देण्यासाठी या वेळी बुलढाणा जिल्हा संघटनेच्या विस्तारित कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली तसेच विविध समाजोपयोगी समित्यांची स्थापना करण्यात आली.

या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून कीर्तीकुमार वर्मा, अनिल वर्मा आणि हेमंतजी वर्मा उपस्थित होते. कार्यक्रमात नेमीचंद वर्मा, संजय वर्मा, जिल्हाध्यक्ष कैलास वर्मा,अनिल वर्मा, ललितजी वर्मा तसेच प्रमुख अतिथी कीर्तीकुमार वर्मा यांनी समाजप्रबोधनपर विचार मांडून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात जिल्ह्यातील महिलांचा उत्साह विशेष लक्षवेधी ठरला. महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत विविध रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामध्ये कृष्णा सहदेव यांची अजमीढजी महाराजांची झांकी तसेच स्नेहल सारडीवाल हिचे 'जिद पर अड़ गये' या पार्वतीवरील नृत्याविष्कार उपस्थितांची मने जिंकून गेला. कार्यक्रमाचे नेटके आणि प्रभावी सूत्रसंचालन सीए सौ. पायल वर्मा व सीए निखिल वर्मा यांनी केले.

मलकापूर समाजातर्फे संपूर्ण कार्यक्रमादरम्यान समाजबांधवांसाठी चहा-नाश्ता आणि स्नेहभोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. सोहळा यशस्वी केल्याबद्दल मलकापूर समाज आणि नवनिर्वाचित कार्यकारिणीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



# टोरंटच्या प्रकल्पाला विरोध राजकीय; मुख्यमंत्री फडणवीसांचा विरोधकांवर हल्लाबोल

## – २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरदरम्यान विविध उपक्रम – लाचेची मागणी झाल्यास १०६४ क्रमांकावर तक्रार करण्याचे आवाहन

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** रायगड जिल्ह्यातील कर्जत आणि भीमाशंकर अभयारण्य परिसरात टोरंट पॉवरच्या प्रकल्पासाठी होणाऱ्या वृक्षतोडीवरून सुरू झालेला विरोध राजकीय असल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. पंप स्टोरेज प्रकल्प हा पर्यावरणपूरक असून ग्रामस्थांच्या हरकती आणि पर्यावरणाशी संबंधित मुद्दे सरकार ऐकून घेण्यास तयार असल्याचेही सांगत फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री मंत्रालयात प्रसार माध्यमांशी बोलत होते.

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका आणि भीमाशंकर अभयारण्य परिसरात टोरंट पॉवर कंपनीच्या प्रकल्पासाठी होत असलेल्या वृक्षतोडीवरून राज्यातील वातावरण तापले आहे. एकीकडे विरोधकांनी या मुद्द्यावरून सत्ताधाऱ्यांना घेरण्याची तयारी केली असतानाच, दुसरीकडे अभिनेते आणि पर्यावरणप्रेमी सयाजी शिंदेंनी यावरून राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. मुख्यमंत्र्यांनी यावर भाष्य केले.

ते म्हणाले की, पंप स्टोरेज प्रकल्पामुळे सौर आणि पवन ऊर्जेतील चढ-उतारांचा समतोल साधता येतो. या माध्यमातून चोवीस तास वीजपुरवठ्यास मदत होते. कोळशावर आधारित वीजनिर्मितीमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी असे प्रकल्प महत्त्वाचे असून कर्जतचा प्रकल्प तीन हजार मेगावॅट क्षमतेचा असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच प्रकल्पासाठी घेतलेल्या जागेपेक्षा दुप्पट क्षेत्र वनविभागाला वनीकरणासाठी देण्यात आल्याचा दावा मुख्यमंत्र्यांनी केला.

याशिवाय प्रकल्पाच्या परिसरात ६० हजार झाडे लावण्यात येणार आहेत. पंप स्टोरेज प्रकल्पाचे आयुष्य बॅटरी स्टोरेजच्या तुलनेत अधिक असून, या तंत्रज्ञानासाठी चीनवर अवलंबून राहणे योग्य नाही. मात्र, या प्रकल्पामुळे होणारी वृक्षतोड, वनक्षेत्रावरील परिणाम आणि स्थानिक नागरिकांच्या चिंता यावरून वाद कायम आहे. प्रकल्पाच्या परिणामांचा अभ्यास न करता विरोध केला जात असल्याचे फडणवीस म्हणाले. यावेळी ग्रामस्थांनी मांडलेले मुद्दे सरकार ऐकून घेईल. यापेक्षा चांगले तंत्रज्ञान उपलब्ध असल्याचे कोणी अभ्यासपूर्ण पद्धतीने पटवून दिल्यास त्याचाही विचार केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार रुपये – राज्यातील सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची मदत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. पुढील दोन दिवसांत मदतीची रक्कम खात्यांत जमा होण्यास सुरुवात होईल आणि दिवाळीपूर्वी सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचवण्याचा सरकारचा प्रयत्न असेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

सक्तीच्या कर्जवसुलीवर गुन्हे दाखल करणार – नांदेडमधील घटनेच्या पार्श्र्वभूमीवर मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून शेतकऱ्यांना त्रास दिल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला. शेतकऱ्यांची तक्रार तातडीने नोंदवून फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना सर्व पोलीस अधीक्षकांना देण्यात आल्या आहेत. दमदाटी करणाऱ्या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल केले जातील. याबाबत रिझर्व्ह बँकेलाही पत्र पाठवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## महत्वाचे...

### मन हेलावणारी घटना; न्यायालयाच्या कामानिमित्त शहरात गेले, भीषण अपघातात दोन चुलत भावांचा मृत्यू

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**धुळे :** अपघाताच्या घटनांमध्ये गेल्या काही महिन्यात वाढ झाल्याचे चित्र असून कुठे कुठे अपघातात प्रवाशांनी जीव गमावल्याची दुर्घटना घडत आहे. दोन दिवसांपूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यात भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. आता, धुळे शहराजवळील बोरविहिर गावाजवळ टोलनाक्याच्या परिसरात सकाळच्या सुमारास झालेल्या अपघातात तालुक्यातील मोरदड येथील दोन तरुण चुलत भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. रात्रीच्या सुमारास दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टरला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने ही दुर्घटना घडली.

न्यायालयीन कामकाजासाठी गावाकडून धुळे शहरात दोन चुलत भाऊ आपल्या दुचाकीवरुन गेले होते. मात्र, गावाकडे परत येत असताना झालेल्या या अपघातात विनोद शामा बागुल यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचे बंधू व सामाजिक कार्यकर्ते सागर काशिनाथ बागुल यांचा आज सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे मोरदड परिसरासह संपूर्ण धुळे तालुक्यात शोककळा पसरली आहे. न्यायालयाच्या कामानिमित्ताने दोघे भाऊ आज धुळ्यात आले होते, आपले काम आटोपून घरी जात असताना हा भीषण अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. एकाच घरातील दोन तरुण भावंडांचा अशा अपघातात मृत्यू झाल्याची बातमी समजताच मोरदड गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. स्थानिक रुग्णालयात नातेवाईक व मित्रांनी मोठी गर्दी केली होती. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी देखील घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून, अपघातास कारणीभूत ठरलेल्या ट्रॅक्टर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

### घरी लेकीच्या साखरपुड्याची लगबग, आनंदोत्सवावर काळाचा घाला; वीजेचा धक्का लागून आई-वडिलांचा मृत्यू

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**जळगाव :** जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यात मन हेलावणारी घटना घडली असून ज्या घरात काही दिवसांनी लेकीच्या साखरपुड्याची लगबग सुरू होणार होती, ज्या आई-वडिलांच्या डोळ्यांत मुलीच्या सुखी संसाराची स्वप्ने होती, त्याच घरावर नियतीने घाला घातला. घरातील आनंदाचे रूपांतर क्षणात दुःखात झाले. लेकीच्या साखरपुड्याची लगीनघाई सुरु असताना, अवघे काही दिवस शिल्लक असताना शेतात काम करताना विजेचा धक्का लागून पती-पत्नीचा दुर्दैवी मृत्यू झाला. भुसावळ तालुक्यातील सुसरी गाव शिवारात घडलेल्या या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे. अशोक बाबूराव पाटील (वय ५५) आणि सरीता अशोक पाटील (वय ४३) दोन्ह अशी मृत दाम्पत्याची नावे आहेत.

मिळालेल्या माहिती नुसार, अशोक पाटील आणि सरीता पाटील हे मजुरांसह सुसरी गावच्या शिवारातील गट क्रमांक १२८१ मधील स्वतःच्या शेतात कामासाठी गेले होते. शेतात कांद्याची लागवड करण्यात आली होती. निंदणी आणि खुरपणीचे काम सुरू असताना शेतातील विद्युत खांबावरील तार तुटून गवतात पडून होती. या तारेचा स्पर्श अशोक पाटील यांना झाल्याने त्यांना विजेचा जोरदार धक्का बसला. पतीला विजेचा धक्का बसल्याचे लक्षात येताच त्यांना वाचविण्यासाठी पत्नी सरीता पाटील याही त्यांच्याजवळ गेल्या असता यांनाही विजेचा जोरदार धक्का बसल्याची नोंद फिर्यादीत आहे. या दुर्घटनेत दोघांनाही जोराचा वीजेचा धक्का बसल्याने शेजारील शेतात काम करणाऱ्या मजुरांनी तात्काळ मदतीसाठी धाव घेतली. दोघांनाही तातडीने वरणगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर दोघांनाही मृत घोषित केले. अशोक पाटील यांच्या मुलीचा साखरपुडा येत्या १ नोव्हेंबर रोजी होणार होता. लेकीच्या आयुष्यातील या महत्त्वाच्या क्षणासाठी आई-वडिलांनी अनेक स्वप्ने रंगविली असतील. मात्र, नियतीच्या एका आघाताने ही स्वप्ने अपूर्णच राहिली. ज्या हातांनी लेकीच्या डोक्यावर आशीर्वादाचा हात ठेवायचा होता, ती लेक क्षणात पोरकी झाल्याचं दुःख मन हेलावून टाकणारं आहे. मृत दाम्पत्याच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा आणि आई असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार हरपल्याने पाटील कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, याप्रकरणी वरणगाव पोलिसांत नोंद करण्यात आली असून सहाय्यक पोलीस निरीक्षक अमितकुमार बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी सुखराम सावकारे तपास करीत आहेत. विद्युत तार नेमकी कशामुळे खाली पडली, याचा तपास सुरू आहे. या घटनेने सुसरी गावासह परिसरात शोककळा पसरली आहे.

### मराठवाडा पदवीधरचा निकाल फिरला, शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रतापसिंह पाटील यांची मोठी आघाडी; महायुतीला झटका

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या मतमोजणीदरम्यान मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून अत्यंत महत्त्वाची बातमी समोर येत आहे. छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीत मोठा उलटफेर पाहायला मिळत असून, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे (महाविकास आघाडी) उमेदवार प्रतापसिंह पाटील यांनी सुरुवातीपासूनच भक्कम पकड निर्माण केली आहे. प्रतापसिंह पाटील यांनी तब्बल चार हजार मतांची मोठी आघाडी घेतली आहे.

आज सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात झाली. सुरुवातीला झालेल्या टपाली (पोस्टल) मतपत्रिकांच्या मोजणीत वैध ठरलेल्या ४९४ मतांपैकी ४५० मतांची मोजणी पूर्ण झाली. यामध्ये महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांना १७४ मते तर महाविकास आघाडीचे उमेदवार प्रतापसिंह पाटील यांना १४७ मते मिळाली. त्यामुळे टपाली मतदानात सतीश चव्हाण यांनी २७ मतांची किरकोळ आघाडी घेतली होती.

# आमच्या लग्नाकडेपण लक्ष द्या! मतपेट्यात सापडल्या भन्नाट मागण्यांच्या चिठ्ठ्या

## महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा मतमोजणीवर आक्षेप

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**पुणे :** विधानपरिषदेच्या पुणे पदवीधर आणि पुणे शिक्षक मतदार संघाच्या मतमोजणीला सुरवात झाली असून पुणे शिक्षक मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार जयंत आसगावकर यांनी मतमोजणीवर आक्षेप घेतला आहे. मतदार संघात जात असताना आम्हाला मोबाईलसह चावी, कागद पेन घेऊन जाण्यास मज्जाव करण्यात आला आहे. त्याबाबत तक्रार केल्यानंतर हा निर्णय मागे घेण्यात आला. तसंच ४२ टेबलची बेरीज एक आली पाहिजे अन्यथा, आक्षेप घ्यावा लागेल, असे ते म्हणाले. मतमोजणी अधिकाऱ्यांवर दबाव असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

पुण्यातील बालेवाडी येथे पुणे शिक्षक आणि पुणे पदवीधर मतदारसंघांच्या मतमोजणीला सुरवात झाली असून मोठ्या पोलीस बंदोबस्तात ही मतमोजणी होत आहे. सकाळी मतमोजणीला सुरवात झाल्यावर महाविकास आघाडीकडून आक्षेप घेण्यात आला. तर दुसरीकडे पुणे पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणी प्रक्रियेवर उमेदवार हर्षदा देशमुख यांनी गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. सीलच्या मुद्द्यावर आम्ही आक्षेप घेतला असून, अद्याप वैध आणि अवैध मतांची फेरी बाकी असल्याचे त्यांनी सांगितले. अजून विजयी मतांचा कोटासुद्धा ठरला नाही, मतमोजणी केंद्रात पाणी आणि बिस्किटांसारख्या मूलभूत सुविधाही उपलब्ध करून दिल्या जात नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पदवीधरांच्या लग्नाचा प्रश्न, नोकऱ्यांचा प्रश्न यावर मतपेट्यांमध्ये भन्नाट चिठ्ठ्या सापडल्याची माहितीही त्यांनी दिली. तसेच अनेक सामाजिक प्रश्न पदवीधरांचेही आहेत. ते सगळेच गंभीर आहेत, त्यावर काम करावे लागेल असेही त्या म्हणाल्या.

यावेळी हर्षदा देशमुख म्हणाल्या की, मतमोजणीच्या ठिकाणी नियोजनाचा अभाव आहे. तसंच यावेळी निकालात नक्कीच बदल घडेल, महाराष्ट्राचा गोकुळ होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. तर जयंत आसगावकर म्हणाले की ऐन वेळी मतमोजणी केंद्रावरील नियमावली बदल करण्यात आले. कागद आणि पेन नेण्यासाठी मज्जाव करण्यात आला. अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यासाठी गेलो तेव्हा जाणवले की अधिकारी देखिल दबावात आहेत. निवडणूक अधिकाऱ्यांवर सरकारचा दबाव आहे असे यावेळी त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपाचे शिक्षक उमेदवार कौस्तुभ गावडे म्हणाले की, पुणे शिक्षक आणि पदवीधर या दोन मतदार संघांची निवडणूक पार पडली असून आज सकाळपासून मतदानाची सुरुवात झालेली आहे. शिक्षक मतदार संघामध्ये तरी खूप चांगल्या पद्धतीने आता पहिला जो टप्पा असतो फिल्टरिंगचा तो झालेला आहे, टॅली झालेल्या आहे. पाचही जिल्ह्यातने खूप चांगला प्रतिसाद मिळतोय मी निवडून येणार हा नक्कीच माझा विश्वास आहे असे यावेळी त्यांनी सांगितले.

# WhatsApp वर तरुणींचे फोटो पाठवायचा, अंधेरीच्या हॉटेलवर व्हायचा सौदा, मुंबईत मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश, तरुणीची सुटका

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईतील अंधेरी परिसरातून एक अत्यंत संतापजनक प्रकार समोर आला आहे. अंधेरीतील एका हॉटेलमध्ये सुरू असलेल्या ऑनलाईन सेक्स रॅकेटचा सहार पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी एका तरुणीची सुटका केली असून, तिची वैद्यकीय तपासणी करून तिला महिला सुधारगृहात पाठवण्यात आलं आहे. याप्रकरणी 'मोनू' नावाच्या मुख्य दलालाविरुद्ध सहार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंधेरी परिसरात मोनू नावाचा एक व्यक्ती वेगवेगळ्या हॉटेल्समध्ये ग्राहकांच्या मागणीनुसार ऑनलाईन पद्धतीने सेक्स रॅकेट चालवत असल्याची खात्रीशीर माहिती सहार पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचण्याचे ठरवले.

पोलिसांच्या एका पथकाने बोगस ग्राहकाच्या माध्यमातून दलाल मोनूशी संपर्क साधला. यावेळी आरोपी मोनूने व्हॉट्सअॅपवर काही तरुणींचे फोटो त्या बोगस ग्राहकाला पाठवले. तसेच, हॉटेलमध्ये पाठवलेल्या महिलेसाठी दोन हजार रुपये आणि हॉटेलच्या खोलीसाठी एक हजार रुपये द्यावे लागतील, असं सांगत त्याने ग्राहकाला अंधेरीतील मरोळ नाका परिसरातील एका हॉटेलवर बोलावले. ठरल्याप्रमाणे २३ ऑक्टोबर रोजी तो बोगस ग्राहक मोनूने सांगितलेल्या हॉटेलच्या खोलीत जाऊन थांबला.

काही वेळानंतर त्या खोलीत एक तरुणी आली. बोगस ग्राहकाने आधीच ठरल्याप्रमाणे बाहेर थांबलेल्या पोलिसांना इशारा दिला. इशारा मिळताच सहार पोलीस पथकाने तात्काळ हॉटेलच्या खोलीवर छापा टाकला.

पोलिसांनी वेळीच कारवाई करत पीडित तरुणीची कसून चौकशी केली. तिने आपल्याला मोनूनेच पाठवल्याची कबुली दिली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्या पीडित तरुणीची या दलदलीतून सुटका केली. त्यानंतर तिला वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आले आणि कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करून तिला महिला सुधारगृहात पाठविण्यात आले.

पोलिसांच्या प्राथमिक तपासात असे उघडकीस आले आहे की, आरोपी मोनू हा त्याच्या संपर्कात असलेल्या तरुणी आणि गरजू महिलांच्या आर्थिक परिस्थितीचा आणि गरिबीचा गैरफायदा घेत असे. त्यांना झटपट पैशांचं आमिष दाखवून ग्राहकांसोबत शारीरिक संबंध ठेवण्यासाठी वेगवेगळ्या हॉटेल्समध्ये पाठवत होता. ग्राहकांकडून मिळणाऱ्या एकूण पैशांपैकी अर्धी रक्कम तो स्वतःकडे बेकायदेशीरपणे ठेवून घेत असे आणि उर्वरित काही रक्कम पीडित तरुणींना देत असल्याचे तपासात समोर आले आहे. फरार दलाल मोनूचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथक नेमले असून, पुढील कसून तपास सुरू आहे.

# जरांगे पाटलांनी एखादा पक्ष स्थापन करावा, ते जाणीवपूर्वक शिंदेंवर टीका करतात; प्रताप सरनाईकांचा खोचक सल्ला

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी लढणाऱ्या मनोज जरांगे यांनी ५०० कोटींची कथित क्लिप समोर आणल्यानंतर राज्यातील राजकारण चांगलंच तापल्याचं दिसतंय. त्यावरून महायुतीतील भाजप आणि शिंदेंची शिवसेनेमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीही झडल्या. दोन्ही गटाकडून मनोज जरांगे यांच्यावरही टीका करण्यात आली. आता शिंदेंच्या शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी मनोज जरांगे यांना खोचक सल्ला दिला आहे. मनोज जरांगे यांनी एखादा राजकीय पक्ष स्थापन करावा, ते जाणीवपूर्वक एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करतात, असं प्रताप सरनाईक म्हणाले.



प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगे यांच्यावर टीका केली. मराठा समाजाला सर्वाधिक न्याय जर कुणी दिला असेल तर तो एकनाथ शिंदे यांनी दिला आहे, असं सरनाईक म्हणाले. एखादा राजकीय नेता जसजसा मोठा होत जातो तसतसे त्याच्यावर टीका होत जाते, असंही सरनाईक म्हणाले. मनोज जरांगे हे जाणीवपूर्वक एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करत आहेत, त्यांनी एखादा पक्ष स्थापन करावा, असं प्रताप सरनाईक म्हणाले. काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे यांनी एक ऑडिओ क्लिप समोर आणली होती. त्यामध्ये श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून जरांगे यांना ५०० कोटी रुपये देण्यात आल्याचं म्हटलं आहे. त्यावरून मनोज जरांगे यांनी एकनाथ शिंदे आणि राज्य सरकारवर चांगलीच टीका केली होती. एकनाथ शिंदेंनी दिलेले ५०० कोटी रुपये नेमके कुठे गेले? असा सवाल त्यांनी केला होता. जरांगे यांनी टीका केल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते बचावासाठी पुढे आले आणि त्यांनी मनोज जरांगे यांच्यावरच आरोप केल्याचं दिसून आलं.

ठाकरेंच्या शिवसेनेचे ठाण्यातील विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणावरही प्रताप सरनाईक यांनी भाष्य केलं. ते म्हणाले की, ''प्रदीप पूर्णेकरांची हत्या ही राजकीय कारकिर्दीतील निर्घुण हत्या आहे. सरकारने या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. परंतु, या राजकीय हत्येचा वापर काहीजणांकडून स्वतःच्या फायद्यासाठी केला जात आहे. राजकीय परिस्थितीमुळेच एकनाथ शिंदे हे पूर्णेकरांच्या घरी गेले नाहीत.''

एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वीच वेतन

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड व्हावी, यासाठी दिवाळीपूर्वी वेतन देण्याचा दिलेला शब्द पाळण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी आवश्यक आर्थिक तरतूद उपलब्ध व्हावी, यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, महाराष्ट्र शासनाने एसटी महामंडळाला सप्टेंबर २०२६ मधील प्रवासी सवलतींच्या प्रतिपूर्तीपोटी ३९१ कोटींचा निधी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे.

# आरोपीचा पाठलाग करताना पोलिसाला हार्टअटॅक, धाडकन जमिनीवर कोसळला, पिंपरीतील धडकी भरवणारी घटना

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**पिंपरी चिंचवड :** पिंपरी शहराला ड्रग्सच्या विळख्यातून वाचवण्यासाठी कर्तव्य बजावत असताना अमली पदार्थ विरोधी पथकातील ३८ वर्षीय हवालदार जावेद बागसिराज यांचे रात्री हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. संत तुकाराम नगर परिसरातील आंत्रिक सोसायटीजवळ एमडी ड्रग्सची विक्री करण्यासाठी येणाऱ्या संशयितांना पकडण्यासाठी त्यांनी सापळा रचला होता, जिथे एका आरोपीला पकडल्यानंतर अंधाराचा फायदा घेऊन पळणाऱ्या दुसऱ्या आरोपीचा पाठलाग करत असताना अचानक त्यांच्या छातीत असह्य कळा आल्याने ते जमिनीवर कोसळले.

वायसीएम रुग्णालयात उपचारादरम्यान उपचारा दरम्यान आलेल्या दुसऱ्या झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली असून, त्यांच्या निधनाने मूळ कर्नाटकातील आणि अत्यंत सामान्य कुटुंबातून २०१० मध्ये पुणे पोलीस दलात दाखल झालेल्या या कर्तव्यदक्ष, संयमी पोलिसाच्या पश्चात १२ वर्षाची मुलगी व ७ वर्षाचा मुलगा असा परिवार असून कसबा येथील कब्रस्तानात सोमवारी दुपारी शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

नेमकं काय घडलं?

अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या एका संशयित तस्कराला पकडण्यासाठी पाठलाग करत असताना गुन्हे शाखेतील एका पोलिस अंमलदाराला अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान दुसरा झटका आल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना रविवारी (२५ ऑक्टोबर) रात्री उशिरा संत तुकाराम नगर परिसरात घडली. जावेद बागसिराज असे कर्तव्य बजावताना मृत्युमुखी पडलेल्या पोलिस कर्मचाऱ्याचे नाव आहे. त्यांच्या या अकाली निधनामुळे पिंपरी-चिंचवड पोलिस दलावर तीव्र शोककळा पसरली आहे.

संत तुकारामनगर परिसरात २ संशयित आरोपी एमडी (मेफेड्रॉन) हा अमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलिस अंमलदार जावेद बागसिराज यांना मिळाली होती. त्यांनी तातडीने याबाबत आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना पूर्वकल्पना दिली. त्यानुसार गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने (अँटी नार्कोटिक्स सेल) संत तुकारामनगर भागात सापळा रचला.

# पदवीधर निवडणूक मतमोजणीच्या दिवशीच उच्च न्यायालयाकडून निवडणूक आयोगाला नोटीस; मतदारयादीत घोळ असल्याचा आरोप

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**नागपूर :** विधान परिषदेच्या नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या मतमोजणीच्या दिवशीच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने निवडणूक आयोग आणि निवडणूक अधिकारी म्हणून विभागीय आयुक्तांना नोटीस बजावली. मतदारयादीत घोळ झाल्याचा आणि हजारो पात्र मतदारांची नावे अंतिम यादीत समाविष्ट न झाल्याचा आरोप करणाऱ्या याचिकेवर मंगळवारी न्यायालयाने ही नोटीस बजावली. संबंधितांनी ३० ऑक्टोबरपर्यत आपले उत्तर सादर करावे, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.



आरटीआय फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन काळबांडे यांनी ही याचिका दाखल केली आहे. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी या प्रकरणाची सुनावणी झाली. याचिकाकर्त्याने निवडणूक प्रक्रियेतील त्रुटींकडे न्यायालयाचे लक्ष वेधले असून, मतदार नोंदणी अर्जाची योग्य छाननी न झाल्याने पात्र मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहिल्याचा दावा केला आहे.

**९८ हजारांहून अधिक मतदारांचा प्रश्न**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघासाठी ९८ हजार ७८२ मतदारांची नावे अंतिम मतदारयादीत समाविष्ट नसल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. मतदार नोंदणीची प्रक्रिया २७ सप्टेंबर २०२६ रोजी बंद झाली. मात्र, त्यावेळी मोठ्या संख्येने नोंदणी अर्ज प्रलंबित होते. या अर्जांची छाननी करून पात्र मतदारांची नावे अंतिम यादीत समाविष्ट करणे आवश्यक होते, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे.

अंतिम मतदारयादी प्रसिद्ध झाल्यानंतर मतदारांना नाव, तपशील किंवा पात्रतेसंदर्भात हरकती नोंदविण्यास पुरेसा वेळ मिळणे आवश्यक आहे. मात्र, प्रलंबित अर्जांची प्रक्रिया पूर्ण न करताच निवडणूक कार्यक्रम पुढे नेण्यात आल्याने पात्र मतदारांवर अन्याय झाल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

**निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलण्याची मागणी**

प्रलंबित अर्जांची छाननी पूर्ण करून पात्र मतदारांची नावे मतदारयादीत समाविष्ट होईपर्यत निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलावी, अशी मागणी याचिकाकर्त्याने केली आहे. या याचिकेवर न्यायालयाने निवडणूक आयोग आणि विभागीय आयुक्तांना नोटीस बजावून ३० ऑक्टोबरपर्यत उत्तर मागितले आहे. त्यामुळे मतदारयादीतील कथित त्रुटी आणि निवडणूक प्रक्रियेबाबत संबंधित यंत्रणा काय भूमिका मांडतात, याकडे लक्ष लागले आहे. सुरुवातीला, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मुख्य न्यायमूर्ती यांच्या आदेशाचा दाखला देत प्रकरण सुनावणीसाठी मुंबईत वर्गीकृत केले होते. मात्र नागपूर मतदार संघाशी संबंधित असल्याने पुन्हा प्रकरण नागपूर मध्ये पाठवण्यात आले.